# डॉ. नितीन मोरे

# संवादोनी प्रकटावे



# संवादोनी प्रकटावे

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# संवादोनी प्रकटावे (विनोद)

लेखक :डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २ सप्टेंबर २०१७

©esahity Pratishthan®2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर

करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

अर्पणपत्रिका

संवाद हा काऊन्सिलींगचा पाया आहे.

गेली कित्येक वर्षे कुटुंब न्यायालयामध्ये संवाद साधत

कुटुंबे जोडण्यात कार्यरत

माझी बहीण डॉक्टर सुजाता चव्हाण हिस

## दोन शब्द

## संवादोनी प्रकटावे !

### एक संवाद.. .

मानसशास्त्राच्या मते संवाद हा दोन जणांच्या संबंधाचा पाया आहे. पाया मजबूत तर त्यावरील इमारत मजबूत.

सुदृढ संवाद म्हणजे सुदृढ नाती !

पण संवादांचे कित्येक प्रकार आहेत.

म्हणजे दरवेळी तो दोघांतच नसेलही.

एकाहून जास्त माणसांत असेल.

कधी स्वत:शीच साधलेला असेल.

कधी दुस-याचे म्हणणे न ऐकता स्वत:चीच मते दामटणे असेल.

त्यात त्या दुस-याचा कळवळा असल्याची बतावणी करणारा राजकारणी संवाद असेल

किंवा

कोणाला बोलू न देता एकट्यानेच आपली गाडी पुढे नेणारा एकतर्फी ‘संवाद’ असेल.

काहींना प्रश्न विचारलेले आवडत नाहीत. ते मग सभा गाजवतात.

काहींना कोणाला प्रश्नच पडू नयेत या खुबीने बोलायची सवय असते.

काही सराईतपणे थापा ठोकून त्यास सत्य भासवतात.

चिमुकल्या बाळाशी बोबडे बोलत मं मं भरवणारा आईचा संवाद...

चार चिमुरडी एकत्र आली तर खेळता खेळता भांडण नि भांडता भांडता खेळतात तो संवाद..

प्रेमी युगुलाचा गुलूगुलु संवाद..

एक व्यापारी आपले पैसे वसूलण्यासाठी हिसका देण्याच्या भाषेत बोलतो तो संवाद.. ..

ते

थेट मोठमोठे पुढारी देशातील जनतेस उल्लू बनवायला करतात ते राजकीय संवाद.

संवादावर जग चालते.
संवाद साधून मने जुडतात.. .
संवाद तोडून ते मोडतात.
संवादावर सारे काही.. चालते नव्हे तर धावते.
इंग्लिशमध्ये याला communication म्हणतात.
म्हणजे समोरासमोर असो.. टेलिफोनवर असो.. की महाजालावर असो..

थोडक्यात काय तर संवादोनी प्रकटावे !
या संग्रहात असेच काही द्वितर्फी तर काही स्वगत ‘संवाद’ आहेत.
काही एकतर्फी  ‘संवाद’ आहेत.
काही गंभीर तर काही उपरोधिक नि काही गंमतीचा भाग आहेत.
लिखाणाची पार्श्वभूमी सांगण्यासाठी हा ही एक साधलेला ‘संवाद’ !

डॉ. नितीन मोरे

**अनुक्रमणिका**


१ एक निरागस संवाद
२ नारायण ! नारायण !
३ ऍंटिकांचा रोमॅंटिक संवाद !
४ एक संवाद रिकाम्या घरट्यातला
५ गुलबकावलीचे फूल
६ शालिनी आणि मालती : संवाद
७ क्रिकेट : एक ‘बोल‘गेम!
८ सखाराम गटणे आणि नाथा कामत
९ एक संवाद, असाही!
१० रिव्हर्स गीता आख्यान
११ ज्याची त्याची भाषा
१२ घास घे रे बाळा
१३ डिग्या : एक स्वगत
१४ ऑफ द रेकॉर्ड : या सत्तेत जीव रमत नाही !
१५ पुराव्याचे शासन
१६ कल्याणकारी !
१७ कपिलागाईचे अध्यक्षीय भाषण : एक संवाद !

## एक निरागस संवाद

'ए मी होणार बाई.. '

'मी'

'तू बाई नाय काय.. मी बाई'

'नाय.. .ही ही ही.. तू बुवा.. '

'बुवाss  बुवाss बावाss बावाss'

'ए तू किनाय सर.. बाई नाई काय'

'श्शुsss मी बाई.. तुम्ही वर्गातली मुले.. '

'चालेल, पण अभ्यास नाय.. पीटीचा पिरियड.. '

'ए पीटीला आपण बाहेर जातो ना ग्राउंडमध्ये'

'श्शुsss.. आवाज नाही.. गोंगाट नाही मुलांनो. नाहीतर हेडमास्तर येतील'

'ह्या.. कुणीच नाय हेडमास्तर इथे. चल पीटीला जाऊया.. '

'ए आज मंगळवारे.. आज नस्तो पीटी.. पीटी उद्या बुदवार'

'आमाला असतो.. ही की नाई'

'तुम्हाला असतो.. तर असेल. पण मी क्लासटीचर.. चला मुलांनो.. गप्प.. '

'गप्पा मारूया?'

'चुप्प.. '

'चुप्पाचुप्पी.. डबा आईसपाईस खेळूया?'

'श्शुssss हाताची घडी.. '

'तोंडावर पोट'

‘ए पोट नाय काय.. ’

‘पोटाची घडी हातावर बोट’

‘नाय काय.. तोंडाची घडी.. ’

‘श्शुsss हाताची घडी तोंडावर बोट.. बाई कोण आहे? मी तुम्हाला आज खूप गृहपाठ देणारे.. तोही गणिताचा’

‘चुप.. आमच्या शाळेत की नाई असा होमवर्क नाय देत आमाला

‘त्यापेक्षा बाई.. गोष्ट.. ’

‘श्शुsss मी काही गोष्ट सांगणारी बाई नाही.. ’

‘मग ऐकणारी आहेस?’

‘ट्रींग ट्रींग ट्रींग ट्रींग.. .’

‘ए ती काय टेलिफोनची रिंग आहे? शाळेची बेल कशी वाजते?’

‘तू बोल’

‘टींग टींग टींग.. ’

‘ए शाळा सुटली.. पाटी फुटली.. ’

‘ए मुलांनो ऐका माझे.. ही खोटी बेल.. गेले सगळे.. शी.. आता मी पण जाते खेळायला..

‘ए चल ब्याटबॉल खेळूयात’

‘माझी ब्याट, मी दोनदा आऊट तर आऊट’

‘माझा बॉल.. मी तीनदा आऊट तर आऊट’

‘ए तीनदा नसते काय.. दोनदा’

‘नाही माजा दादा बोलला.. तीनदा’

‘तीन नाय.. दोन.. ’

‘ए, पण एक टप्पा आऊट’

‘आणि एलपीडब्लू नाय’

‘एलपी नाय काय एलबीडब्लू.. मी क्रिकेट कोचिंगला जातो ना सरांनी सांगले मला’

‘पण एलबी नाय,,आणि त्या छपराला लागलं तर आऊट’

‘त्या जोशींच्या कंपाऊंडात गेला तर पण आऊट’

‘तिथे सिक्स.. ’

‘नाही.. तिथे कुत्रा आहे.. तिथे बॉल गेला तर.. ’

‘ए सिक्स नाय मारायची हां.. तो डॉगी चावला तर’

‘इंजेक्शन देतात, पोटात.. माझी मम्मी बोलली मला’

‘बापरे.. इंजेक्शन? पण सिक्स नाय मारायची.. फोर चालेल’

‘आणि तो कुत्रा तिथे असताना सिक्स मारली तर जो मारेल तोच बॉल आणणार’

‘हे.. हे.. ब्याटसमन कधी फिल्डींग करतो काय?’

‘ए चल ना लवकर खेळूया.. माझी आई बोलवेल मला अभ्यासाला’

‘चला.. पण टीम बनवूया’

‘मी कॅप्टन’

‘मी पण.. ’

‘ए मी विकेटकीपर नाय.. बोर होतो तिथे’

‘ए त्यापेक्षा आपण डबाऎसपैस खेळूया?’

‘नाय.. लगोरी’

‘नाय चिप्पी.. .. ’

‘आज आम्ही शाळेत कबड्डी खेळलो.. ’

‘ओम कबड्डी कबड्डी कबड्डी.. .’

‘चल लवकर बॉलिंग कर.. मी ओपनर

‘आधी टॉस.. ’

‘पण आपल्याकडे कॉईन कुठाय?’

‘मी कॅप्टन.. माझा हुकूम.. ’

‘ए,,हुकूम बोलायला हे काय पत्ते आहेत? पाच तीन दोन?’

‘ए चल लवकर खेळूयात’

‘मी नाही.. मी सायकल चालवणारे.. ’

‘मी पण.. ’

‘मग आम्ही खेळतो.. ब्याटबॉल’

‘खेळा.. आम्ही सायकल.’

‘धूम.. धूम.. धूम मचादे धूम मचादे.. ’

‘धूम धूम.. धूम’

‘ए माला पकड.. चोरपोलिस खेळूया’

‘मी नाय.. तू जोरात धावणार.. .’

‘ए मी.. राज्य कोणावर? अक्कड बक्कड बंबे बो.. .खेलना है तो खेलो.. नहीतो गेट आऊट.. ’

‘ए जास्तीची मेजॉरिटी.. ’

‘ए मी घरी जाणारे.. माजा संकल्पदादा येणारे’

‘मी हैना काल पाहिला.. पोकेमॉनचा गेम’

‘पाहू.. पाहू.. मला दाखव’

‘दाखव नाय काय.. तो दादाच्या मोबाईल मध्ये’

‘तुझा दादा देतो तुला?’

‘होss, मक्सा मारला की.. ’

‘ए मक्सा नाय मस्का.. ’

‘आईशपथ.. मला आता आठवलय.. मला सॉलिड होमवर्क आहे.. इतिहास भूगोल.. आई ओरडेल.. मी घरी जाणारे’

‘मी पण.. मला शिनचॅन पायचाय’

‘मी पण घरी जाणारे.. ’

‘मी पण.. ’

‘ए ते दोघेच बघ ब्याटबॉल खेळतात’

‘ए आम्ही पण येतो.. उद्या मॅच आपली’

‘चालेल.. मी धोणी’

‘मी कोहली.. ’

‘चल बाय.. ’

‘बाय.. ’

*****

२.

( स्थळ : रेल्वे गाडीतील एक डबा, एक आठेक वर्षाचा फाटक्या कपड्यांतला मुलगा. हातात खेळणी, चित्रांची पुस्तके घेऊन.. )

'साब, ले लो ना.. '

'.. .. .. .'

'प्लीज साब.. ले लो..  खिलौना.. ये नई किताब है.. पिक्चर वाली.. '

'.. .. .. .'

'प्लीज साब.. आपका बेटा या बेटी बहुत खूश हो जायेंगे साब.. खिलौने लेलो साब.. छोटे बच्चे के लिए.. साब.. '

**नारायण.. .नारायण.. !**

‘नारायण.. .नारायण.. ’

‘म्हणजे काय? गुड मॉर्निंग.. .की हाऊ आर यू?’

‘नारायण.. .नारायण.. म्हणजे दोन्ही.. .पहिला.. गुड.. दुसरा.. हाऊ.. ’

‘अरे वा ! इंग्लिश शिकलात की तुम्ही मुनीवर.. ’

‘नारायण.. .नारायण.. जगात.. नव्हे या विश्वात असे काय आहे जे आम्हास ज्ञात नाही?’

‘ज्ञात.. म्हणजे ठाऊक, माहित.. असणारच.. थेट देवाच्या घरून येताय तुम्ही.. ’

‘नारायण.. .नारायण.. देवाच्या म्हणा.. त्याहून विश्वविधात्याच्या किंवा जगन्नियंत्याच्या.. घरून.. आम्ही येथे विहार करीत आहोत.. ’

‘म्हणजे फिरत आहात.. ’

‘नारायण.. .नारायण.. तू काय भाषांतरकार.. आहेस की काय वत्सा?’

‘मुनिवर.. नाही. मी फक्त चारचौघांस समजेलसे.. ’

‘नारायण.. .नारायण.. म्हणजे आकलन.. ’

‘होय मुनिवर.. सगळयांना समजेल अशी भाषा.. ’

‘नारायण.. .नारायण.. वत्सा.. तू अजून नादान आहेस.. ’

’आणि या भवसागरात गटांगळया खात आहे का मी मुनिवर? पण नुसतेच अडाणी म्हणा.. ’

‘नारायण.. .नारायण.. नाही.. .आमच्या भाषाकोशात असे शब्द नाहीत.. नि असले तरी ते वापरण्याची आम्हास परवानगी नाही आणि ती असली तरी आमची तशी इच्छा नाही.. .नारायण.. .नारायण.. ’

‘असे म्हणजे मुनिवर? सोपे?’

‘नारायण.. .नारायण.. सोपे नव्हे वत्सा.. सुलभ.. ’

‘का बरे मुनिवर?’

‘नारायण.. .नारायण.. या विश्वविधात्याच्या राज्यात आम्ही एक सेवक.. राज्य चालवणे ही तो विधात्याची इच्छा.. नारायण.. .नारायण.. ’

‘खरेय.. पण मुनिवर.. तुम्ही ज्ञात ऎवजी माहित म्हटलात.. विधात्याऐवजी देवाचे नाव घेतले असते तर.. ’

‘नारायण.. .नारायण.. ?’

‘म्हणजे सोपी भाषा वापरली असतीत तर?’

‘नारायण.. .नारायण.. वापरली असती पण.. ’

‘पण काय मुनिवर?’

‘नारायण.. .नारायण.. आमचा मुनीपणा आड येतो.. ’

‘म्हणजे?’

‘नारायण.. .नारायण.. अरे मुनिवराने कसे जड भाषेत वदले पाहिजे.. ’

‘मुनिवर.. आता साध्या भाषेत सांगा.. ’

‘नारायण.. .नारायण.. सरकारी खाक्या तो.. सरकारी भाषा.. जडजंबाळच हवी.. सगळयांना कळली तर.. ’

‘तर काय मुनिवर?’

‘नारायण.. .नारायण.. सगळयांना कळली तर समजून सांगणारे.. .त्यांचे काय होईल?’

‘म्हणजे?’

‘नारायण.. .नारायण.. आता आमची भाषा साधी.. वत्सा.. ऎक नीट.. सांगतो.. साध्या भाषेत सांगतो.. समजून घे.. ही देवाची यंत्रणा.. ती सर्वात वरची..

सरकारी यंत्रणा.. समाज.. मग छोट्या छोट्या अजून यंत्रणा.. त्यांच्या नियंत्रणाखाली असणारे लोक.. त्यांना दिलेल्या आज्ञा.. .ती समजणारे कमी.. मग समजावून सांगणारे लोक.. त्यातून हवा तसा अर्थ काढून घेणारे.. तुम्ही लूपहोल म्हणतात तसे.. मग समजणारे मोठे.. इतरांहून कसे श्रेष्ठ.. देववाणी.. संस्कृत.. ती कठीण.. म्हणून श्रेष्ठ नि पवित्र.. ती सगळयांनी नाही शिकायची.. ज्यांनी शिकायची ते मोठे.. छोट्यांनी शिकायचीच नाही आणि छोटेच राहायचे.. आता तीच गत तुमच्या इंग्रजीची.. जो फाडफाड बोलेल तोच मोठा.. जो नाही तो छोटा.. भले तो आपल्या भाषेत मोठा विद्वान का असेना.. '

'खरेय मुनिवर.. '

'वत्सा.. भाषा हे शस्त्र आहे.. जे जोडण्यासही वापरता येते नि तोडण्यासही.. तुम्ही वापरता तोडण्यास.. जो इंग्रजी बोलतो तो मोठा.. जो कठीण बोलेल तो वरचा.. साध्या.. म्हणजे योग्य भाषेत सांगेल.. तो बिनकामाचा.. '

'मुनिवर.. म्हणजे लालित्यपूर्ण बोलू लिहूच नये?'

'नारायण.. .नारायण.. वत्सा.. तू ऐकलेच नाहीस नीट.. आम्ही योग्य भाषा म्हणालो.. योग्य ठिकाणी योग्य भाषा.. त्यात गंभीर विचार ही नि लालित्यपूर्ण भाषा ही आली.. नारायण.. .नारायण.. आणि योग्य नव्हे.. सुयोग्य.. '

'मुनिवर.. मग तुम्ही का अशा कठीण.. क्लिष्ट भाषेत वदता?'

'नारायण.. .नारायण.. आम्ही मुळात कळलावे आहोत.. .त्यात सर्वांस समजले तर.. ? किती कळ लावावी.. कितींना कळ सोसावी लागेल.. नारायण.. .नारायण.. '

**ऍंटिकांचा रोमॅंटिक संवाद !**

'खुल्लमखुल्ला प्यार करेंगे हम दोनों.. .इस दुनियासे नहीं डरेंगे हम दोनों.. '

'काय हो.. वय काय.. गाताय काय?'

'घाबरतो काय.. इस दुनियासे नही डरेंगे.. चल तूही म्हण.. ड्यूएट'

'चहाटळपणा नकोय.. बोळके झाले तोंडाचे.. '

'बोळके कसले.. ?कवळ्या आहेत माझ्याकडे.. ह्या पहा.. हा.. हा.. हा.. '

'चांगली देवादिकांची भजनं गायची.. ही कसली गाताय गाणी?'

'भजनाला पुण्य आणि खुल्लमखुल्ला म्हणजे पाप?'

'अहो जरा वयाचा विचार?'

'ठीके.. खुल्लमखुल्ला भजन म्हणेंगे हम दोनों.. इस दुन्यासे नही ड्रेंगे हम दोनों.. आता ठीक?'

'काहीतरीच.. नशीब पोरं नाही घरात.. '

'म्हणूनच.. आणि पोरं काय.. पोरांचीही पोरं झाली.. आजीबाई.. खुल्लमखुल्ला.. हम तुम इस कमरेमें बंद हो.. '

'आज काय झालंय तुम्हाला?'

'मुझे ये प्रेम का रोग लगा.. काय झालंय काय? गाणी म्हणायची लहर आलीय.. '

'ती ठीक पण म्हणून असली? थिल्लर?'

'थिल्लर?'

'मवालीलोक म्हणतात असली गाणी'

'मवाली? मी तुला मवाली दिसतोय? हा गजाभाऊ.. मवाली? ही गाणी हिरो नि त्याची हिरवीण म्हणतात.. आज तू हिरवीण मी हीरो.. '

'असला दातपडक्या हीरो? लोकं हसतील.. '

'हसू देत.. हसतील त्याच्या कवळया दिसतील.. गजा रे गजा.. काय तुझी मजा.. गाणे म्हण अजून.. लोक वाजवतील बेंडबाजा.. गाणे म्हणणे हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच.. '

'हूं.. लोकमान्य.. नगरात राहणारे मि. ग.जा.ठाकूरसाहेब.. कायतरी चांगले ऐकवा.. '

'ठीक तर मग.. ऐक.. काय म्हणू? देवाघरचे ज्ञात कुणाला की नभ मेघांनी आक्रमिले?'

'नको.. नको.. नाट्यगीतांची चिरफाड.. '

'नकोना.. मग ऐक.. मेहबूबा मेहबूबा.. मेहबूबा.. मेहबूभा.. .ऊऊऊऊऊ.. .गुलशन मे फूल खिलते हैं.. '

'बस.. आज एकूणएक उठवळ गाणी.. '

'तूच त्या नाट्यगीतांना नाही म्हणालीस.. घेई छंद मकरंद.. नायतर मग सुखकर्ता दुखहर्ता.. '

'म्हणा.. आरती म्हणा'

( सुखकर्ताच्या चालीत )

'खुल्लमखुल्ला प्यार करेंगे दोनो.. इस दुनियासे.. इस दुनियासे नही डरेंगे दोनो.. खुल्लमखुल्लम.. '

'बास.. झाली तेवढी चेष्टा पुरे.. देवाच्या नावावर असली थट्टा? शोभत नाही.. वयाचा विचार करा.. '

'तो करूनच म्हणतोय.. खुल्लमखुल्ला प्यार करेंगे.. हम दोनों.. मेरे दिल में आज क्या है तू कहे तो मैं बता दूं.. तेरी वेणी घालके दूं.. तुझे.. '

'कायतरी.. '

'अगं तुला कधीपासून सांगायचा प्रयत्न करतोय.. '

'काय?'

'अगं आज घरी कोणी नाही.. तुम मैं और ये तनहाई.. चल आसमां के पीछे.. चल दरियामें डूब जाएं.. '

'छ्छू.. कोणी ऐकेल.. म्हातारचळ लागलाय?'

'नो.. .अगं या मुंबईत जागाच नाही.. कधी पोरं तरी कधी पोरांची पोरं.. जरा रोमॅंटिक होऊ म्हटले की आजोबा.. शू आलीय नाहीतर आज्जी भूक.. '

'श्शु.. असं बोलवतं कसं.. सोन्यासारखी नातवंडं'

'तसं नाही गं, पण आपल्या दोघांना एकत्र बसूनही किती वर्षं झाली? चलो आज कुछ तूफानी करते हैं'

'तूफानी? हाडॆ मोडून घ्याल.. नि मग मोजत बसाल.. तूफानी म्हणे.. '

'तसं नाही गं.. चल आज जाऊ जेवायलाच बाहेर'

'नको.. '

'का?'

'पोट बिघडून घ्याल.. मग जात बसाल पळत पळत.. '

'नाही बिघडणार.. अगं पोलादी पोट माझे.. '

'हूं.. '

'चल ना तयार हो.. खुल्लमखुल्ला.. '

'येईन.. पण एका अटीवर.. '

'बोल.. सब शर्तें मंजूर.. नाचीज हाजिर है.. हुकूम महारानीजी.. '

'अट हीच.. गाणे एकदम बंद.. ऑफकोर्स बंद.. '

'वा ! लगेच मानलेत?'

'हूं.. गाण्यात काय आहे? आता जातो आहोत बाहेर दोघे तर प्रॅक्टिकलच करूयात.. खुल्लमखुल्ला.. '

'चहाटळ.. कुठले.. थांबा येते तयार होऊन.. '

'आजा.. जिया बेकरार है.. आयी बहार है.. आज हम ऍंटिक.. बने रोमॅंटिक.. '

**एक संवाद: रिकाम्या घरट्यातला**

'मालू ss ए मालू'

'आले हो,  काय कटकट आहे?'

'माझे बोलणे तुला कटकट वाटते?  किती बदललीस तू?  देख तेरे संसार की हालत क्या हो गई भगवान कितनी बदल गई मालू'

'हूं,  आचरटपणा नको, वय काय गाताय काय?'

'अग अभी तो मैं जवान हूँ,  पण तू बदललीस'

'बदलले मी नाही, तुम्ही आहात'

'मी?  चांगली प्रेमाने हाक मारली..   मालू..   माली..   मालती..   मधुमालती.. '

'जा, तुमचे काही तरीच,  अशी हाक मारली ना की मला वाटलं..   तुम्ही ए काऊ अशी हाक मारली की काय, चिमणरावातल्या सारखी..   आठवतंय ना'

'ओह!  ती कशी विसरणार कावेरी..  नाही काऊ..   sorry मालू'

'श्शु sss कोणी ऐकेल.. '

'ऐकू देत,  कोणाच्या बापाला भितो का काय हा विश्वनाथ..   हसू नकोस'

‘हसू नको तर काय?  आठवतात ते दिवस, तुम्ही आमच्या घरी आलेलात, मागणी घालायला..   एका व्यक्तिची भंबेरी आठवतेय?’

‘अगं मालू मी तेव्हा लहान होतो.. ’

‘लहान?  म्हणजे काय बालविवाह की काय?’

‘नाही, त्यात तुझे ते कर्नल रायबहादुर बाबा..   ठाकुर,  कोणीही घाबरलं असतं,  जसं काय त्यांच्या पोरीला खायला आलेला वाघ होतो.. .’

‘बरं बरं,  मग प्रेम करताना नाही घाबरलात ते?’

‘वा!  आग तो दोनों तरफ थी महारानीजी..  एक तरफा नहीं’

‘बस बस..   पण विशू किती घाबरला होतास तू आठवतंय?’

‘आठवतंय, पण शेवटी केलं ना manage?  शेवटी मैंनेच पटाया ना?’

‘श्शी!  काय ही भाषा?  मला माहीत असतं की हा मराठीचा प्रोफेसर अशी भाषा बोलेल तर.. .’

‘तर काय राणीसरकार?’

‘मी नाही बोलणार.. ’

‘पण मस्त मजा आली सासरेबुवांना propose करायला.. . ये हाथ.. मुझे दे दे ठाकुर’

‘शीss काय फिल्मी.. ’

‘फिल्मी न बिल्मी..  पण पटले ना ठाकुरसाहेब..   काय ना तो शोले.. तुला सांगतो नंतर कधी शोलेत तो गब्बर बोलतो ये हाथ मुझे दे दे तर बाकी बघणारे टेन्स आणि मी हसतोय.. किती वर्ष गं..  शहात्तर साल.. वेळ जायला वेळ नाही लागत..  मग तू बसंती, मी वीरू..   दोन पोरी..   त्या ही उडाल्या भुर्र.. चिमण्यांसारख्या..   आता काय..  नाही मालू..   अगं मालू’

‘तुम्ही ना उगाच गंभीर होता..   विशू कसा नुसता हसायचा..  आपल्या लेकी तुला काय म्हणायच्या..   जोकर’

‘नुसता जोकर नाही..   जोकर नंबर वन’

‘विशू पण आता मस्त, दोघी मजेत, सुखीच म्हण आपापल्या घरी..  तू आणि तुझे ते विनोद,  विनोद कसले,  प्रोफेसर साहेबांचे पीजे..   पण मला नाही हसायला येत तुझ्या बावळट जोक्स वर’

‘तुला विचारतंय कोण?  माझ्या पोरी हसल्याना एवढे या जोकरला पुरे.. सरकार! किती गमतीदार आयुष्य नाही?  बालपण.. शाळा.. college.. प्रेमप्रकरणं.. ’

‘क्काय?  प्रेमप्रकरणं?  अनेकवचनी विश्वनाथ?  मराठी व्याकरणात चुकणार नाहीत तुम्ही प्रोफेसर’

‘अगं in general म्हणालो..  तुला माहीती मी किती नाकासमोर.. ’

‘हां, पण नाकच थोडं वाकडं’

‘बघना मग मुलं होणार..  ती मोठी होणार..  त्यांची शाळा नि शिक्षण.. पैसा जमवा..  तुझं office..  मग पोरांची लग्नं.. ’

‘आज काय असला मूड विशू..  अरे असा हळवा नकोस होऊ.  आम्हा बायकांना जमतं ते,  कारण आम्ही जातो सोडून आमचं घर,  मग नवरा, पोरं, हेच जग..  तुला नाही कळणार..  पण पोरी सासरी गेल्या तर तू किती रडलास ते पाहिलं मी’

‘छे मालू,  तो विषय नको..  I know only one thing..  My daughters are happy that's all. मालू कुठून कुठे आला विषय..  तुला बोलवले कशासाठी नि पोचलो कुठे.. ’

‘ह्यात नवीन काय विशू?  तुझ्या काळजाचे तुकडे गेले, आपला कुठलाही विषय कुठल्याही दिवशी इथेच येऊन पोहोचतो’

‘पण मालू काही दिवसापासून सांगू मला काय वाटते.. कर्नल साहेब बरोबर होते,  च्यायला आपली पोरगी दुस-याघरी पाठवायची.. काय खायची गोष्ट आहे? साला you got to be strict and खडूस like कर्नलसाब’

‘प्रोफेसर साहेब..  जरा ती भाषा..  मराठीचे पीएचडी तुम्ही.. ’

‘अगं काऊ.. आतून येतेना ती भाषा..  खरी भाषा’

‘तर तुमचे काय महत्वाचे काम होते?  ’

‘मालू,  काही नाही गं, जरा प्रेमाने हाक मारायचा प्रयत्न ग, आवाजात मृदूपणा आणायची practice’

‘चला, काहीतरीच तुमचे, इतक्या वर्षांनी हे काय नवीन? मी आले सगळे सोडून’

‘मग म्हण गाणं, मैं तुझसे मिलने आई मंदिर जाने के बहाने.. ’

‘छे काहीतरीच तुझं बाई..  विशू’

## गुलबकावलीचे फूल !

‘मल्लिका-ए-तरन्नुम.. .’

‘जी हां, शहेनशाह.’

‘मी तुला शहेनशाह दिसतोय? हातात फूल नि जपमाळ घेतलेला?’

‘ऑफकोर्स ! तू माझा राजा.. . आता नको म्हणूस की रिश्ते में तो हम.. ’

‘हम आपके हैं कौन?’

‘सांगू? हीरो.. नंबर.. शंभर’

‘आणि म्हणून तू ते गाणे गात होतीस ना? मल्लिका-ए-तरन्नुम? तू मेरा तू मेरा हीरो नंबर वन.. ’

‘ते उगीच रे. पण बरे झाले तू आलास, तेही न बोलावता’

‘हूं. तुमने नही पुकारा तरीपण हम चले आए.. काय हवंय राणीसरकार?’

‘सरकार? लोकनियुक्त?’

‘लोकनियुक्त? नो, हे एकाधिकारशाही सरकार.. घाबरतोय का मी कुणाला?’

‘एकाधिकार? बरे ते जाऊ देत.. देना मला.. ’

‘काय? राणी सरकार ऊर्फ राणी गव्हर्नमेंट?’

‘राणी गव्हर्नमेंट? मी काय राणी एलिझाबेथ?’

‘यस्स. नो. एल्लि इज ओल्ड.. वो बुढिया, तू चिडिया. तू गुडिया फ्रॉम इंडिया.. तू ना.. प्रिन्सेस.. प्रिन्सेस डायना.. ’

‘चल जा.. डायना म्हणे’

‘यस.. मेड इन चायना नाही.. डायना, डायना.. पिरीत मनी माईना.. आनंद पोटात माज्या माईना रं माईना.. ’

‘मराठमोळी डायना? फॉरेनची पाटलीण?’

‘तर, काय बोलतेस प्रिन्सेस डायना?’

‘येस..  प्रिन्स विल्यम.. इन हाफ पॅंट.’

‘प्रिन्स इन हाफ पॅंट?!’

‘हो. मला गुलबकावलीचे फूल दे आणून’

‘गुलबक्षी चालेल? की गुलबकावलीच? द फूल्स ऑफ गुलबकावली?’

‘होय, गुलबकावलीच’

‘मला वाटते ना तुझा जीव की नाही त्या निळ्या तळ्यातल्या सोनेरी माश्याच्या पोटातल्या सोनेरी साखळीत असावा.. राजकुमारी’

‘काय ना मस्त गोष्टी? गुलबकावलीचे फूल.. मस्तच..  पण आता मला राजकुमारा ते दोन गुलबकावलीचे डबे दे’

‘डबे? गुलबकावलीचे?’

‘म्हणजे ते दोन डबे दे फळीवरचे काढून’

‘होय राणीसरकार देतो आम्ही सत्वर. जशी आज्ञा’

‘आणि जरा हळू..  नाही तर हा राजबिंडा राजपुत्र.. ’

‘म्हणजे मी? प्रिन्स विल्यम?’

‘हं. तूच. अंगावर पाडून घेशील पिठाचा डबा आणि.. ’

‘इथे व्हायची पिठोरी पौर्णिमा !’

‘चल लवकर दे काढून’

‘यस्स सरकार. बंदा हाजिर है. हुकूम की तामिली करने. चला हीरो कणकेचा डबा काढने !’

‘थ्यांक्यू राजा’

‘हूं, संसार ! दुसरे काय? पण आहे मस्त’

‘काय हा कणकेचा डबा?’

‘नाही गं राणी..  हे सगळेच..  गुलबकावलीचे फूल !’

‘हो ना राज्जा.. ’

## शालिनी आणि मालती संवाद

*( शालिनी आणि मालती दोघी मैत्रिणी. एकाच ऑफिसात काम करणाऱ्या. कामात चोख, लोकांशी नीट व्यवहार करणाऱ्या. परत 'चित्त तिचे पिलांपाशी' प्रमाणे घर आणि मुलांत चित्त अडकलेल्या. कोणाच्या पाठी वाईट न बोलणाऱ्या आणि कोणाचे वाईट ही न चिंतणाऱ्या. त्यांचा हा प्रतिनिधिक संवाद.*

*दोन महिला कधीही कुठेही भेटल्या की गप्पांना सुरूवात होते. त्यात ह्या मैत्रिणी. त्यांचा हा संवाद. या गप्पा कुठून सुरू होऊन कशावर पोहोचतील सांगता येत नाही. त्यांना अंत नाही. कित्येकदा तर दोघांचे समांतर बोलणे चालू असते. चांगले तास भर बोलून झाले तरी घरी आल्यावर कामातून वेळ काढून त्यांना परत फोन वर बोलणे चालू ठेवावे लागते. त्यांना काळाचे आणि विषयाचे बंधन मानवत नाही. यातील शालिनी कोण नि मालती कोण महत्त्वाचे नाही. )*

'चल गं लवकर, ट्रेन चुकेल.'

'अगं हो एवढी ही सही करते नि निघते.'

'एवढी काय कामात गढलीयस गं?'

'अगं आलेच.'

दोघी निघतात.'

'हाडवळे साहेबांनी बोलावले होते आता. ती लॅण्ड लाईनची फाईल होती.'

'काय साहेब ऑरडले की नाहीत?'

'साहेब कधी बोलतात काय? नुसते ओरडत तर असतात.'

'हो ना, त्यांची मिसेस कशी काय राहात असेल?'

'अगं तुला माहित नाही ती त्यांच्या वरताण आहे.'

'म्हणजे दोघांची जुगलबंदीच घरी होत असेल.'

'जुगलबंदीवरून आठवले, मला त्या फाईन आर्ट मध्ये झाकिर हुसेन च्या जुगलबंदीची तिकिटे काढायची आहेत.'

'हो का? तबला. आमचा रोहन शिकायचा, त्या कारेकरांकडे.'

'कारेकर म्हणजे ते सद्‌गुरू सोसायटीतले का?'

'हो ना, त्यांची बायको जरा लंगडते ती.'

'लंगडणार नाहीतर काय? वजन किती आहे तिचे. तिने तबल्यावर थाप मारली तर तोच फुटायचा.'

'अगं वजनावरून आठवलं तो तिकडचा रामशरण भाजीवाला आहे तो वजनात चांगलाच मारतो बरं. मागे मी एक किलो मटार आणले, घरी येऊन मोजले तर ९०० ग्रॅम.'

'घरी वजन काटा आहे तुझ्या?'

'तो नाही का त्या दिवशी ट्रेन मध्ये घेतलेला छोटा.'

'हा परवा. चालतो का चांगला?'

'हो ना, तर त्या रामशरणकडून मटार घेतले त्यातले निम्मे पोकळ. सोलून पुरते ५५० ग्रॅम भरले फक्त.'

'मटारचे काय करतेस?'

दोघीही ट्रेन मध्ये चढतात. ट्रेन रिकामी, कल्याणहून सुटणारी. जागा बघून बसतात. बॅगेतून भाजी काढून निवडायला सुरूवात करतात.

'रोहिणीला आवडतात म्हणून कचोऱ्या केल्या होत्या. ह्यांना पण आवडतात. तळून मस्त लागतात.'

'मी नाही जास्त तळत. धूर होतो ना. मग खोकला.'

'मी तर ती चिमणीच बसवून घेतली आहे.'

'चिमणी काय नि कावळा काय, आमच्याकडे काही बसवायचे तर प्रथम नाहीचा पाढा. चिमणी काय मला खायचीय पण हे ऐकणार नाहीत.'

'अगं, हल्ली खऱ्या चिमण्या पण कमी झाल्यायत म्हणे. आमच्या सोसायटीत बसवलीयत त्यांच्या साठी रेडीमेड घरटी.'

'मागे पेपरात वाचले की मोबाईल मुळे चिमण्या कमी झाल्यात.'

'बघू, नवा मोबाईल?'

'हो. नोकियाचाच आहे. मागे सोनीचा घेतला तो बिघडला.'

'सोनीचा टीव्ही बरा म्हणे.'

'आपण कुठे टीव्ही बघतो? एवढा वेळ कुठे आपल्याला.'

'हो ना. मी फक्त ती सासू निघाली सासरला सिरियल बघते.'

'मी पण. ती कोण सासू आहे तिच्या गळयातील माळ किती छान होती नाही?'

'मला ती तशी साडी घ्यायची ती कला नेसली होतीना त्या धाय मोकलून रडण्याच्या प्रसंगात तशी.'

'हो. मी पण घेणार आहे या वाढदिवसाला.'

'अगं, माझ्या रागिणीचा वाढदिवस आहे आता महिन्याभरात. तिला नवीन सायकल पाहिजे म्हणे. म्हणजे बसला २-३हजाराचा फटका.'

'हं. या दिवाळीत रोहन ने उडवले हजाराचे फटाके. आता त्यामुळे खोकला झाला. कोपऱ्यावरच्या शहा डॉक्टरांना दाखवले, आता जरा बरा आहे.'

'शहा डॉक्टरांची औषधे जरा स्ट्रॉंग असतात ना.'

'हो ना, पण लवकर बरे वाटते ना. काय औषधं महाग झालीयेत हल्ली.'

'महागाई खरंच वाढलीय खूप. सरकारचे काही खरं नाही. गॅसचा भाव ही वाढणार आहे म्हणे.'

'अगं हो, त्यादिवशी ते कॅंटीन मध्ये सामोसे खाल्ले तर चांगलाच गॅस झाला पोटात. कोणते तेल वापरतो कोणास ठाऊक.'

'कुठल्या त्या रामूच्या कॅंटीन मध्ये?'

'हो ना. तिकडे मला कोण भेटावी? ती मंगला साठे.'

'मंगला म्हणजे त्या चेंबूर ब्रांच मधली.'

'हो. काय सुटली आहे सांगू.'

'मंगलाचे नि माझे कधीच जमायचे नाही सांगते. पण बरे झाले ती तिकडे बदलून गेली.'

'हो ना. अगं यांची पण बहुधा बदली होईल घाटकोपरच्या ब्रांचेत. मग बरंय जायला यायला सोपं.'

‘घाटकोपरात? माझ्या नणंदेची आत्या राहते. त्या गणपतीच्या देवळामागे. तिला गुढगे दुखीचा आजार आहेना.’

‘अगं तिकडे कर्जत मध्ये एक म्हात्रे वैद्य आहेत ते चांगली आयुर्वेदिक औषधे देतात गुढघेदुखीला. स्टेशन जवळच आहे दवाखाना. खूप गर्दी असते म्हणे.’

‘पण फार स्ट्रॉंग नाहीत ना? नाहीतर गरम पडायची. अगं, कर्जत मध्ये आपली नवीन ब्रांच उघडते आहे का?’

‘कोणास ठाऊक. तिकडे बदली नाही झाली म्हणजे बरे. पण आमच्या घरी आंब्याच्या झाडाची ब्रांच अगदी खिडकी जवळ आली आहे.’

‘मग तू काय डायरेक्ट आंबे खाणार काय या वर्षी? आंबे काय महाग होते नाही मागच्या वर्षी, चारशे रूपये डझन.’

‘मी नाही जास्त खात आंबे कारण मला फोड होतात.’

‘अगं, त्याच्या साठी ते मलम लावायचे आमच्या डॉक्टरांनी दिलंय. तुला सांगेन नंतर. फोन कर घरी गेल्यावर.’

‘अगं अजून आंब्याच्या सिझन ला वेळ आहे, मग दे.  अय्या  घाटकोपर आलंय बघ. बोलता बोलता लक्षच राहात नाही.’

‘यावर्षी मी टोमॅटो कॅच अप करणारे घरी. स्वस्त पडतो खूप. रोहनला खूप आवडतो. एक दिवस सुट्टी घेऊन करीन. सध्या सुट्टी मिळणे कठीण आहे.’

‘बनवशील तर मला पण दे थोडा. मी त्या टोमॅटो कलरच्या साडीला मॅचिंग चप्पल घेतली त्या दिवशी.’

‘कुठून? लेगएंड मध्ये सेल आहे म्हणे.’

‘सेल? पाहायला पाहिजे एकदा.’

‘अगं चल आलं वाटतं कुर्ला. उद्या परत ऑफिसात ऑडिट आहे. माझं सगळं तयारच आहे.’

‘मी त्या हाडवळे साहेबांना सकाळीच सर्व बॅलन्स शीट्स दाखवल्या आहेत.’

दोघीही उतरतात. एक पूर्वेस राहते नि दुसरी पश्चिमेस.

घरी पोहोचल्या की घरच्या कामाला लागतात. थोडी उसंत झाली की मालतीचा शालिनीला किंवा शालिनीचा मालतीला फोन जातोच.

'काय बिझि का?'

'नाही गं जरा ही मेथी निवडत होते. आज मुटके करीन बहुधा मेथीचे. यांना खूप आवडतात.'

'अगं मला पण एकदा शिकव. मागे तू त्या दुधी भोपळयाचे थालिपिठ सांगितले ते सर्वांना खूप आवडले. डब्यात मुटके आण उद्या.'

'हं आणते उरले तर.'

'अगं फोन का केला तर महत्त्वाचे सांगायला आज वेळच मिळाला नाही. ती फाईल हाडवळे साहेबांनी दिलीय त्यात परांजपे बाईंच्या सह्या बाकी आहेत.'

'हो का? ठीक मी बघते. बरं झालं तू सांगितलंस.'

'हो ना आपण एकत्र आलो पण बोलायला आपल्याला वेळच मिळाला नाही ना.'

'बरं मी बघते. परांजपे बाईंना मध्ये बरं नव्हतं ना?'

'हो ना, काहीतरी अल्सर बिल्सर असं म्हणाल्या. तिकडे कोणी झुनझुनवाला डॉक्टर आहेत त्यांना दाखवले म्हणाल्या.'

'टेन्शन मुळे असेल गं. हाडवळे साहेब काही आपल्याला सुखाने जगू देणार नाहीत.'

'खरंय गं बाई तुझं.'

'चल मग सकाळी भेटू ८.५७ ला'

'चालेल.'

'तेवढे मुटके विसरू नकोस.'

'बरं बाई.'

**क्रिकेट.. .एक 'बोल'गेम !**

१

'ए, मॅच पाह्यली काय?'

'मी पाहिली.. दादा बरोबर.. सॉलिड आहे'

'तुला काय वाट्टं? कौण जिंकणार?'

'ऑब्व्हीयस्ली.. मी.. नेमी मीच जिंकतो माहित्येय.. '

'ते नाय काय.. मॅच मधे.. '

'न्यूझीलॅण्ड.. '

'ए चूप.. श्रीलंका.. '

'दोघे चूप.. मॅच इंड्या ऑस्ट्रेलियाची आहे.. '

'मग इंड्याच.. मी खोली.. '

'ए खोली नाय काय.. कोहली.. '

'मी कोहलीच बोल्ला.. हो की नाय?'

'ए कोहली.. तुजी अनुष्का कुठाय?'

'हे हे हे.. मी जातो.. दादा बोलावतोय.. '

'बाय.. कोहली.. मी पण जातो.. माला ना ती सुपरमॅनची ऍड पाह्यचीय..
'

'झिप झॅप.. झूम.. '

'ए दुस-या इनिंगनंतर खेळू आपण.. '

'ए वनडेत कुठे असते सेकंड इनिंग.. '

'नसेल.. मग आयपीएल मध्ये असेल.. '

'चल मी जातो.. माझी ऍड.. '

‘झिप.. झॅप.. .झूम.. .’

२

‘साला काय तोडेला है’

‘तोडेला की तुटेला.. ? २२५ स्कोअर?’

‘ते नाय रे.. लास्ट तीन ओव्हरमध्ये म्हणतोय.. पंचेचाळीस रन्स.. कायतरी डिफेंडेबल.. ’

‘हं.. तो एक्स्ट्राकव्हरवरून मारलेला शॉट.. ब्याटची एज लागून.. ’

‘अरे.. तो बॉल थोडा स्विंग झाला.. पण.. त्याचे टायमिंग ग्रेट यार.. फुल्ल फॉर्म यार’

‘साला धोनी खेळला असता ना.. .’

‘त्याने फेकली रे विकेट.. अरे फुल लेन्थ बॉल.. हा बॅकफूट वर.. कात सपकन बॉल आत आला.. थोडा फॉरवर्ड खेळला असता तर शुअर बाऊंडरी.. स्ट्रेट’

‘पण कोहलीला ढापला रे.. क्लिअरली बॉल आऊटसाईड ऑफ स्टंप होता रे.. उगाच एलबीडब्ल्यू.. ’

‘हूं.. . पण च्यायला बॉलिंग खतरनाक ऑस्ट्रेलियाची.. राऊडी राठोड साला.. १४५चा स्पीड.. टकलावर लागला ना तर कायमचा आऊट.. ’

‘तुला काय वाटतंय.. जिंकू आपण?’

‘इंपॉस.. साला फॉर्ममें आहे ऑस्ट्रेलिया.. दोन विकेट गेल्याना तर काहीतरी चान्स’

‘हूं.. .नेहरा नि शर्मा.. बॉलिंग पडली पाहिजे मागच्या मॅचसारखी.. नेहराचे बॉल काय ग्रेट इनकटर.. ’

‘आयला.. टाइम झाला.. चल मॅचनंतर भेटू.’

३

‘हाय! मॅच पाहिलीस का?’

‘छे गं!’

‘तू तर म्हणालीस की तू टिव्हीसमोरून हलणार नाहीस.. ’

‘नाहीच हलली मी.. पण मॅच नाही पाहिली’

‘मग काय सास बहू सिरियल?’

‘छे.. सो डाऊनमार्केट यार.. मी फक्त त्याला पाहिली.. ’

‘तो? तुझा लांब केसवाला?’

‘सो क्यूट.. आणि हॅंडसम यार.. मी बाकी काही नाही पाहिली.. आणि मी बोलणारे त्याला केस कापायला’

‘ए माझ्या घरात सगळे चिडलेत.. मागच्या मॅचमध्ये साधा कॅच टाकला म्हणून’

‘साधा? सोपा नव्हता तो.. अगं त्याच्या डोळ्यावर तो फ्लडलाईट आला.. पाहिलंस ना.. आणि माणूस आहे, कधीतरी चुकणारच’

‘तुला काय वाटतेय.. कोण जिंकणार मॅच?’

‘कोणी का जिंकेना.. ही इज द विनर.. ऑफ माय हार्ट.. चल बाय.. ’

‘बाय? वेळ आहे अजून.. ब्रेक.. ’

‘ते नाही गं.. त्याची ऍड येईल आता.. .चल बाय.. फोन ठेवते मी.. ’

४

‘काय गं पाहिलीस मॅच?’

‘छे गं.. ते आल्याचं लोणचं बनवतेय.. सगळं सामान काढून ठेवलेलं’

‘मग काय लोणचं घालता घालता पाहायचीस’

‘तशी कॉमेंट्री येते गं ऐकू’

‘तुला काय वाटतं? जिंकू?’

‘अगं मन्या म्हणतोय बहुधा जिंकू.. म्हणजे जिंकतील’

‘पण तुला स्कोर माहितीय ना.. एवढ्या कमी रन्स.’

‘अगं मिळते ऍडमिशन.. तुला माहितीये त्या इंदूच्या मुलीला मिळाली 89वर झेवियर्स मध्ये.’

‘तू धन्य आहेस.. मी मॅचचा स्कोर म्हणतेय.. ’

‘हो का? किती गं कमी म्हणजे? चारेकशे?’

‘तुला काहीच माहिती नाही दिसतेय.. ’

‘छे गं .. आपल्याला काय.. सगळे पाहतात म्हणून पाहायची.. मन्या म्हणाला ते पटते मला.. कोहलीनी पहिली बॉलिंगच घ्यायला हवी’ ‘होती. नाही जमत आपल्याला तर कशाला ब्याटिंग पहिल्यांदा.. आता मला कळते ते त्याला कळू नये?’

‘हो ना.. हद्द झाली.. चल अजून कोणाचा तरी फोन येतोय.. मग बोलते’

‘हो.. मी करेन मग फोन.. ’

‘लोणचे पाठव हां’

‘नक्की.. ’

५

‘काय पण खेळतात.. ’

‘हूं.. गल्लीतले पण चांगले यापेक्षा’

‘अरे त्या धोनीला उगाच माजवून ठेवलाय रे’

‘तो परवडला.. शर्माला उडवा.. काय धुलाई केली त्याची’

‘शर्माची धुलाई? कुठल्या मॅच बद्दल बोलताय? पण त्याने पहिली ब्याटिंग कशाला घ्यायची?’

‘फिक्सिंग हो सगळे फिक्सिंग.. धिस जंटलम्यान्स गेम ह्याज गॉन टू डॉग्स.. आपल्या वेळी.. ’

‘हो ना.. अरे इतके पैसे मिळतात नीट खेळा ना.. च्यायला २५ ला ३ विकेट्स.. पहिल्या बॉलवर विकेट’

‘मी असतो तर त्या शर्माला पहिला उडवला असता.. काय ते लांब केस मुलीसारखे.. यू ह्याव टू अर्न द क्याप.. ’

‘खरंय रे.. पण हे सगळे अर्न च्या मागे लागलेत.. सगळे आयपीएल मध्ये पहा कसे धावतात सशासारखे.. ’

‘हूं.. चांगला हातातला क्याच सोडला.. यांनी सोलकरला नाही पाहिले कधी’

‘हो ना.. अरे ते स्पिनर्स.. बेदी.. वेंकट.. प्रसन्ना.. चंद्रा नी सोलकरची फिल्डिंग.. च्यायला काय टीम होती’

‘मला वाटतंय उगाच मॅचमध्ये वेळ घालवतो आपण.. वेस्ट ऑफ टाइम’

‘उद्या कुठली म्याच?’

‘मी ती नाही.. इंडिया श्रीलंका पाहणार शनिवारी’

‘पण तुम्ही बघणार नव्हतात.. ’

‘ते जाऊदेत.. फायनला पोचणार आपण’

‘शक्य आहे.. पण ओपनर्स खेळलेत नीट तर.. मागच्या दोन मॅचमध्ये.. झीरो.. .’

‘फिक्सिंग असेल.. ’

‘मला कळत नाही एवढे सरे अकराच्या अकरा कसे फिक्स होतात.. ?’

‘हं.. साला कंट्रीबिंट्री नाही काही.. ’

‘पण आज बॉलिंग चांगली झाली तर’

‘अरे २२५ काय स्कोर आहे? तेही ऑस्ट्रेलियाविरूद्ध’

‘झाला अर्धा तास.. ब्रेक संपला असेल.. चला जाऊया.. पहिली ओव्हर महत्त्वाची’

‘हो.. लो स्कोअर मॅच मध्ये.. खरंय तुमचे’

‘आठवतंय.. वर्ल्ड कपची मॅच? १८३.. वाली’

‘ते जुनं झालं आता.. चला जातो.. मॅच सुरू होईल’

‘हं.. .मॅच नंतर या खाली.. भेटू.. ’

६

‘अरे गोविंदा.. ’

‘काय आई’

‘अरे ती म्य़ाच बघतोयस’

‘हो आई’

‘मला काही दिसत नाही रे.. चश्मा दे पाहू’

‘राहूल.. आजीला चश्मा दे.’

‘हा.. आता दिस्तेय रे.. काय रे गोविंदा.. ’

‘एक मिनीट आई.. जरा ऎकू देत’

‘बरं बाबा.. गप्प बसते.. पण तेवढा गावसकर आला खेळायला की सांग’

‘सांगतो.. तो गावसकर रिटायर होऊन बसलाय कॉमेंट्रीबॉक्सात.. आला की सांगतो हां आई’

‘तो परेंत मी वेंकटेश स्तोत्र म्हणू घेते रे बाबा.. ’

‘मनात म्हण हां आजी.. ’

**सखाराम गटणे आणि नाथा कामत**

‘मेरेको एक प्लेट वडा’

‘मेरेकू मसाला डोसा, जरा कडक भाजो’

‘तू आणि डोसा?’

‘यू आर राईट. खरे तर डोसा मला अजिबात आवडत नाही’

‘मग का खातोयस?’

‘अरे तिची आठवण म्हणून’

‘या वेळी ती कोण?’

‘कोण जाणे’

‘म्हणजे?’

‘तिचे नाव माहित नाही’

‘मग आठवण कोणाची?’

‘अरे ती, काल इथेच होती, डोसा खात, मी असा इथे बसलेला, ती तिच्या मैत्रिणी बरोबर’

‘मग?’

‘तिला डोसा फार म्हणजे फार आवडतो सांगत होती.’

‘कोणाला? तुला?’

‘नाही तिच्या मैत्रिणीला. मी ऐकत होतो नुसता’

‘चोरून?’

‘छे, मी आणि चोरी? चोरी तर तिने केली माझ्या ह्या हृदयाची, काय ना की मी असा इथे नि ती तिथे’

समोरच्या बाकाकडे हात दाखवत तो म्हणाला

‘मग?’

‘मग काय, डोसा संपला नि ती गेली’

‘मग तुझी काय ओळख देख?’

‘छे ! ओळख नाही, फक्त देख’

‘आणि तरीही तू उसासे टाकतोयस?’

‘ऑळख कशाला हवी? शुद्ध प्रेम या सर्वांपलिकडे असते’

‘शुद्ध प्रेम की शुद्ध गाढव पणा?’

‘TNS म्हणजे तू नही समझेगा, तू पोरींना पाहून लाजतोस तुला कसले कळणार प्रेम?’

‘पण खरे सांग ती ही कितवी?’

‘कितवी काय? ती काय हिशेब ठेवायची बाब आहे?’

‘वा ! काय आर्ग्यूमेंट आहे !’

‘आहेच मुळी, ये जालिम दुनिया सिर्फ हिसाब मांगती है पर दरया में पानी कितना? तुझ्या ह्या डोक्यावर केस किती? या जगात झाडे किती? त्या तिथे दिसते ना त्या आंब्याच्या झाडावर पाने किती? आहे उत्तर?’

‘नाही.’

‘पण याचा काय संबंध? ’

‘आहे मित्रा आहे. पुलंचा नाथा कामत माझा रोल मॉडेल आहे, त्या प्रमाणे मी प्रेक्षणीय स्थळांवर टेहळणी करतो.’

‘मस्त ! टेहळणी ! तू आता पेपरात कॉलम लिही, टेहळणी बुरूजावरून मी’

‘कर तू माझी टिंगल पण काय आहे मी हा असा, हार्ट असे तळहातावर घेऊन फिरणारा तरूण’

तो छातीच्या उजव्या बाजूस हात लावत बोलला

‘अरे ह्या बाजूस असते ते हार्ट,डावीकडे’

‘असेल, उजवी काय नि डावी काय ? काय फरक पदतो? हार्ट म्हणजे हार्टच आणि ती म्हणजे तीच. आणि मी हा असा.’

‘म्हणजे कसा?’

‘रोमॅंटिक. एवढ्या सुंदर कन्यका सगळीकडे, काही पटतात काही नाहीत’

‘पटतात काही? कधी दिसल्या नाहीत वामांगी कोणी?’

‘तुला नाही समजणार प्रेमाची गोष्ट. ती दिसणे, ती असणे, ती नसून ही दिसणे, हे जाणे, फक्त प्रेमदीवाणे’

‘कळले बाबा, दिवाणे कसले तुम्ही तर चकणे’

‘तू आज चेष्टा कर, पण माझ्यामुळे आह रोमान्स जिवंत आहे या जगात’

‘रोमान्स? तुला सांगू तू तुझा आदर्श बदल, नाथा नको’

‘चुप्प. नाथा इज नाथा’

‘नाही रे, सांगू का सखाराम गटणे आदर्श हवा’

‘गटण्या? तो पुस्तकी कीडा? तो आणि आदर्श, हा मी चाललो’

‘का? आणि हा डोसा? आठवण संपली काढून तिची?’

‘नो, जिथे माझा असा अपमान होतो तिथे मी थांबत नाही, गटणे म्हणे गटणे’

‘ते ठीक, जा तू, तुझा डोसा मी संपवीन, मित्र म्हणून तुला मदत केलीच पाहिजे मी, पण या डोशाचे बिल?’

‘बिल? नाही. मी आणि अन्नब्रम्हाचा अपमान, कदापि नाही. एवढे खाऊन निघतो.’

थोडा वेळ फक्त खाण्याचा मच मच आवाज

‘आता बोल गटण्या कसा रोमॅंटिक?, पोटात डोसा गेला, ती आठवली. सुरेख !’

‘काय सुरेख? हा डोसा?’

‘छे ! ती अनामिका. बरे आता तुझे ते गटणे पुराण, सुरस आणि चमत्कारिक’

‘तू दोन्ही वाचलेस?’

‘कोण दोन्ही?’

‘नाथा कामत आणि गटणे?’

‘परत माझा अपमान? असू देत, नाथा मी वाचलाच नाही, जगलोय, आणि ऑफकोर्स गटणे पण वाचलाय’

‘तू वाचलाय पण समजला नाहीस’

‘व्हॉट डू यू मीन?’

‘शेवटी काय होते?’

‘कशाच्या शेवटी?’

‘नाथा नि गटणे’

‘काय होते?’

‘नाथा घुमुन फिरून परत. समुद्रात पाणीच पाणी पण पिण्याला थेंब ही नाही.’

‘म्हणजे? हे घे पाणी, पी’

तो पाण्याचा ग्लास पुढे करत म्हणाला.’

‘नाथा वॉज अनमॅरीड आणि गटणे?’

‘गटणे ? काय?’

‘तुला माहित नाही?’

‘नाही.’

‘अरे, गटणे गेट्स मॅरीड आणि असा तसा नाही, व्हेरी अर्ली. आणि एका वर्षात जीवनाशी एकनिष्ठ ही. तेव्हा गटणेचा आदर्श ठेव बाबा’

‘असे म्हणतोस, देअर यू हॅव ए पॉइंट’

‘नाही, गटणे सारखा बोल, फाडफाड मराठीत’

‘ओ.के.’

‘परत नो बॉल?’

‘सॉरी. सॉरी क्षमस्व. तुझा मुद्दा विचार करण्याजोगा आहे’

‘म्हणजे माझ्या बोलण्यात बिंदू आहे म्हण की ! येथे बिंदू म्हणजे पॉइंट बरे !’

‘खरेच ! मी आता ठरवलेय’

‘काय?’

‘सखाराम गटणेच माझा आदर्श’

**एक संवाद.. .. असा ही!**

‘काय कसं काय?’

‘आतापर्यंत बरे होते.. आता माहित नाही’

‘म्हणजे?’

‘ते जाऊ द्या.. काय म्हणतोय.. रेडा?’

‘रेडा काय म्हणणारेय? वेद?’

‘भारीच बुवा तुम्ही विनोदी.. चांगली गाडी तुमची.. इको फ्रेंडली.. ’

‘हे आता काय? इको.. .’

‘तुम्हाला नाही माहित? पेपर नाही वाचत की काय?’

‘छे.. वेळ कुठंय?’

‘खरंय.. सगळीकडून ह्याला उचल.. त्याला उचल.. बिझी शेड्यूल.. ’

‘हं.. नाईलाज.. काम.. काम‘

‘आमच्याकडे ते गाणे आहे.. सुबह और शाम.. काम और काम.. ’

‘पण ते इको.. कायतरी म्हणजे?’

‘पर्यावरण स्नेही!’

‘हां, आता कळले.. रेडा माझा अमर आहे. आणि ना इंधन ना प्रदूषण.. ’

‘खरंय.. यमराजांसाठी कुठे असणार.. दुसरा यमराज? आत्मा अमर असतो तसे तुम्ही पण.. अमर.. ’

‘हं.. .काय करायचंय अमर होऊन.. ’

‘का हॊ? इथे सगळे भितात तुमच्या येण्याला.. नि वर जाण्याला’

‘ठीकच ना.. काहीतरी.. कसली तरी भीती.. सुरू होते ते संपते कुठेतरी.. याची खात्री.. कितीही तुम्ही दीर्घ आयुष्य मागितले तरी अमरत्व मागत नाही कोणी.. ’

‘खरंय यमराज.. आमचा आशीर्वाद पण असलाच.. दीर्घायुषी हो.. .माझी आजी म्हणायची हाताची बोटे मोडत.. म्हताराsss हो.. ती गेली बिचारी’

‘हं.. .’

‘हं.. काय? तुम्हीच तर नेलीत ना?’

‘हं.. ’

‘कुणी म्हणत नाही.. अमर हो.. किंवा होशील.. असा आशीर्वाद नाही ना कुणी देत.. ’

‘ते तुमचे तुम्ही पहा पृथ्वीवर.. ’

‘बरं आज इकडे कसं काय येणं केलंत?’

‘येणं? नेण्यासाठीच येतो आम्ही.. ’

‘कोणाला हो? इथे आजूबाजूस नाही कोणी.. ’

‘हं.. .म्हणजे कोण? ओळखा?’

‘म्हणजे.. .मी जायचे की काय? आणि काय किमान सभ्य माणसाचे नियम तर पाळायचेत.. ’

‘नियम?’

‘अहो इथे कोणी कुणाकडे न सांगता जात येत नाहीत.. किमान फोन तरी.. आणि तुम्ही? अचानक.. ?’

‘अचानक?’

‘हो.. च.. अचानक.. काहीतरी सांगावा.. ’

‘पाठवला होता ना.. ’

‘कधी?’

‘त्या फायलीतले रिपोर्ट.. हृदय कमजोर.. श्वास लागतोय.. पायास सूज.. अजून काही सांगू?’

‘ते सांगताय हो?’

‘मग काय थेट पत्र लिहीणार की काय?’

‘नाही.. पण.. ’

‘पण बिण नाही.. अरे एकदा माझ्याबरोबर यायचे म्हतले की तुम्ही लोक नाही नाही ते बहाणे करता.. मग सगळे विसरून जाता.. इशारे.. चला.. ’

‘यमराज.. .जरा दोन दिवसांची सोय होईल तर.. ’

‘ते होणे नाही.. ललाटरेषा संपली.. ’

‘नाही म्हणजे तसे चहापाण्याला.. ’

‘दोन दिवस? चहापाण्याला?शेवटची इच्छा की काय? नशीब या थंडीत ही इच्छा नाही.. एकदा पावसात भिजून येतो.. ’

‘यमराज.. असे कसे हो.. तुम्हाला इकडचे कायदेकानून माहित नाहीत? रितीभाती ठाऊक नाहीत.चहापाणी मला नाही.. तुम्हाला.. ’

‘आम्हाला चहाही नको नि पाणीही.. आम्हाला काय समजलात? स्वर्गात सुरा पिणारे सुर आम्ही.. चहा पाजताहेत.. ’

‘यमराज.. म्हटले ना मी.. सामान्यज्ञान तोकडे पडतेय.. बरं.. एक होईल का बघा.. तुमच्या रेड्य़ास चांगली अंगावर घालायला देतो.. हरणाची कातडी.. प्युअर.. की आम्ही तुम्हालाच काही?’

‘हे काय? प्रत्यक्ष यमराजालाच लाच?’

‘काय यमराज तुम्ही.. लाच काय? हा रितीरिवाज.. इथे तर आम्ही सगळ्या कामांसाठी करतो असे.. बेकायदा कामांसाठी मोठी.. गणपतीबाप्पांना

सोन्याचा मुकुट.. देवीला सोन्याच्या जरीची साडी.. ते घेतात.. आमची कामेही होतात.. नि काय यमराज.. हा साळसूदपणा?'

'हं.. ऐकलंय खरे.. अरे त्याला नवस म्हणतात तुम्ही लोक.. आणि ते देवाधिदेव पण तिथे आहेत.. हैराण.. ना बोलू शकत ना काही करू शकत.. यांची कामे झाली.. चढवा मुकुट.. नाही तर अजून काही.. तोंड दाबून बुक्क्यांचा मार.. प्रत्यक्ष देवाला.. एक मीच सुटलोय.. कोणी बोलतो.. यमराजाला नवस? आज ती ही कसर भरली.. रेड्या.. .उचल रे.. वेळ झाली.. '

'काय राव.. जरा.. सम.. .जू.. न.. घे.. त.. .ले.. .. .अ.. स.. .ते.. .. .. .. .. .'

**आणि काही..**

**एकेरी.. ..**

**'स्व-गत' संवाद !**

**रिव्हर्स गीता आख्यान**

जय जय रामकृष्ण हरी..

जय जय रामकृष्ण हरी.. .

तुकाराम महाराज की जय..

ज्ञानेश्वर महाराज की जय..

आज लावलेय ते रिव्हर्स गीता आख्यान.. .

रामा रामा हरे हरे रामा.. .रामा..

महाभारताची गोडी काय वर्णावी महाराजा..

इकडे युद्धभूमीवर शंख ध्वनी झालाय.. समरप्रसंगच तो..

आता एक वीर दुस-या वीरास भिडणार.. बाणावर प्रतिबाण.. गदेवर गदा.. त्यांचा खणखणाट होणार.. घोडे चीत्कारणार.. गजदल मार्गक्रमण करणार.. मस्तवाल हत्ती शत्रूंस पायतळी तुडवणार.. चिरडणार..

ते पहा रथ.. .रथी, महारथी नि त्यांचे सारथी..

त्या वीरांबरोबर.. आता युद्ध पेटणार आहे महाराजा.. .

आणि हे काय होतंय महाराजा..

आता येथे धनुर्धारी अर्जुन हटून बसलेला आहे.. .

काय सांगू साहेबानू तो सीन..

अर्जुन म्हणतोय.. म्हणतोय.. कशी करू मी लढाई.. माझ्याच सोय-यांशी.. नाही हे होणे नाही..

श्रीकृष्ण सारथ्य करतोय.. धनुर्धारी पार्थाचे.. म्हणतोय.. अर्जुना.. हात लेका..

एवढी गीता सांगितली मी.. .

पण या डोक्यात प्रकाश किती? शून्य..

अर्जुना.. चल उठ.. आपले कर्म करीत रहा.. फळाची अपेक्षा नको करूस.. निव्वळ कर्म.. हाच तुझा धर्म.. पार्था.. पार्था.. उचल ते धनुष्य, जोड तो बाण आणि घे वेध लक्ष्याचा.. धर नेम..

पण महाराजा.. या महाभारतात वेगळेच रामायण घडतेय.. काय.. ?

ऐका..

पार्थाचा आज मूड काही औरच आहे महाराजा..

पार्थ विचार करतोय.. प्रत्यक्ष कृष्ण म्हणतोय म्हणून.. पण मी का ऐकावे?

मग काय व्हायचेय महाराजा.. महारथी अडून बसलाय..

कृष्णाची गीता झालीय सांगून.. काय तो कर्मयोग.. पण अर्जुनाच्या मनात काही अजूनच आहे..

बघा सीन पहा तो युद्धभूमीवरचा..

इकडे अर्जुन अडून बसलाय.. .आपले धनुष्य टाकून.. नाही हृषिकेशा.. नाही होणार हे युद्ध.. .नो.. नाय.. नेव्हर..

कृष्ण गोंधळात.. एवढी गीता सांगितलीय मी.. पण इथे काय? तर पालथ्या घड्यावर.. पाणी.

पण प्रत्यक्ष कृष्ण भगवान ते.. दयासागर.. कृपासागर..

पार्थाकडे पाहून त्यास आली दया.. बा अर्जुना.. लढत नाहीस म्हणतोस? राहिले.. नको लढूस.. पुढच्या वेळी बघू.. लढशील नि जिंकशीलही.. आता आजच्या भाषेत.. बेटर लक नेक्स्ट टाईम.. तेव्हा आता जस्ट चिल..

*पार्थ बसे खाली मटकनी । तया म्हणे हृषिकेशी*

*जाऊ दे झाले ते । जर तुला इच्छाच नसे ॥*

आता अर्जुन बावचळला.. कृष्णाने कसे कृष्णासारखे रहावे, कृष्णासारखे बोलावे की नाही? हा रणछोडदास?

कृष्ण म्हणतोय..

*प्रत्येकास अजून मिळेल । गा एकू चान्सू*
*मग नशिबाची । साथू मिळेल गा ॥*

अर्जुन अजून बुचकळयात.. आज एकाएकी या भगवानास झाले तरी काय.. देवा तू सुद्धा बदललास की काय?

कन्हय्या पुढे म्हणतोय..

*चल गा खाऊ ती भेलपुरी । चौपाटीवर पाणीपुरी*
*म्हणशील तर मारू । पिक्चर एकू ॥*

आता पार्थास हार्टाट्याक यायचा बाकी आहे. काय झाले आहे कृष्णकन्हय्या? चक्क किसी डिस्को मे जाये.. किसी हॉटेल मे खाए.. म्हणतोय हा?

अर्जुनाच्या उपदेश न ऐकण्याने कृष्ण भगवान उद्विग्न झालेत..

*अगा जे मी कंटाळूनी । दिधले सोडून या जनी*
*उपदेशाची औषधी । खूप जाली.. ॥*
*ऐसा म्हणे चक्रपाणि । उपदेशाची बोलणी*
*वाहतसे जैसे पाणी । घड्यावरी उलट्या ॥*

आता पार्थाची पाळी आहे बरे महाराजा.. कृष्णाने त्यास उपदेशीले.. अजून नाही विसरलाय.. देवा !.. देवाने कसे देवासारखे वागावे.. .!

अर्जुन म्हणतोय..

*ऎसा कैसा तू द्वारकाधीशा । विसरशी आपुलीच गीता*
*वागावे त्वां देवासम । पार्थ म्हणे ॥*

अर्जुनास आठवतेय कृष्णाची गीता.. पुढे अजून काय म्हणतो पहा तो..

*नको ऎसा म्हणे पार्थ । करू देवा अनर्थ*
*आपुल्याच उपदेशाचा । अर्थ का विसरशी ॥*

तर जनहो.. .पार्थ कृष्णास काय म्हणाला? हे द्वारकानाथा.. तूच असे करशील.. तूच असा बोलशील तर कसे होणार?

कृष्ण त्यावर म्हणतोय, उपदेश करून कंटाळलो बाबा.. आता जाऊ मस्त चौपाटीवर.. लेट्स एन्जॉय !! नाहीतरी माझा उपदेश पालथ्या घड्यावर पाण्यासारखा

अर्जुन पुढे म्हणतो.. देवा करू काय सेवा? अरे देवा.. हा लोकांचा अधिकार आहे.. जुने दिवस गेले आता.. तू गीता सांग.. उपदेश कर.. शेवटी मानणॆ न मानणे हे ठरवणार कोण? हाच मानव.. देवा आठव तुझा कर्मयोग ! तर आता ऎक

*जन गा अति हुशार । उपदेशाचे त्या मोल फार*
*एके कानी आइकुनी । सोडती दुस-याने ॥*

*मा फलेशू कदाचन । उपदेश तुझाच जाण*
*कोणी माने ना माने त्वां । फरक तो कैसा ॥*

पार्थ म्हणतोय, देवा तुम्ही फलाची अपेक्षा नका ठेऊ.. . सांग ती गीता, कर उपदेश.. मा फलेशु कदाचन देवा.. स्वत:चीच शिकवण विसरू नकोस.. तेव्हा तुझी गीता मी ऐकली.. मी नाही तयार लढाईस.. पण तू देवपण नको विसरूस.. .भगवान!

कृष्णाचा अर्जुनावर भारी जीव महाराजा.. .त्याच्या डोळयात पाणी.. भक्त असावा तर असला.. माझी शिकवण लक्षात तर ठेवतोय.. अमलात आणत नाही तर काय झाले..

कृष्ण त्याला म्हणतो

*कृष्ण म्हणे गा पार्था । नाम तुझे ते सार्था*
*रिव्हर्स ती गीता । सांगतसे ॥*

रामा रामा हरे हरे रामा.. .रामा

तर असे हे रिव्हर्स गीता आख्यान महाराजा..

आपल्याच गुरूला शिकवणारा आज का अर्जुन.. .ते कृष्ण भगवान धन्य नि पार्थ ही धन्य..

बोला.. .

जय जय राम कृष्ण हरी.. .

जय जय राम कृष्ण हरी.. ..

**ज्याची त्याची भाषा**

*( दिवाकर रणदिवे हे 'अखिल भारतीय जनपंचायत पक्ष' हे अखिल भारतीय नाव धारण करणाऱ्या पण फारशा प्रसिद्धीत नसणाऱ्या पक्षाचे महाराष्ट्रातील प्रमुख. त्यांच्या पक्षाचे अखिल भारतीय अध्यक्ष श्री. रामनरेश यादव महाराष्ट्राच्या दौऱ्यावर नुकतेच येऊन गेले. त्यावेळी रणदिवेंनी केलेले हे भाषण. यादव साहेबांना मराठी येत नसल्याने ही हिंदीतून केलेली धडपड )*

बंधुंओ और भैणीयों,

आज मैं आप सबका मेरे मन के और हृदयके तळ से वेलकम करता हूं. हमारे आदरणीय और वरिष्ठ नेताजी श्री. रामनरेशजी यादवजी साहेब आज इथे पधारलेले हैं और आज वे हम सबको संबोधित करेंगे. उनके इस डायरेक्शन की हम सबको बहुत तहान लगी हुई है, म्हणूनच तुम सगळे बडे बेताबीसे तहानभूक विसरकर इधर उनके भाषण की वाट देखते बैठे हुए हैं. रामनरेशजी साहेब हमारे फक्त नेताच नही है, पण हमारे आदर्श भी हैं. इसके कारणही हम सब उनके पाय पर पाय डालके चलनेका प्रयत्न नेहमीच करते आए हैं. उनका नेतृत्व ही हमे पुढका रस्ता दिखाएगा. आप सब उनका विचारोंसे लुप्त भाषण सुननके लिए उत्सुक हैं ये मुझे ठाऊक है. पण उसके पहिले मैं यादवजी साहेबजी के बारेमें काही चार शब्द बोलना चाहूंगा.

रामनरेशजी यादवजी साहेबने अपने पक्षके प्रगती के लिय क्या कुछ नही किया. उन्होंने इसके लिए बहुत खस्ता खाईं हैं. दिवसरात्र मेहनत करना कोई उनसे शिके. जब हमारा पक्ष कुचभी नही ता तब इन्होंनेही उसे पाळा और पोसा और इतना मोठा बनाया. आज हमारे पक्षका जो भी कोई नाव है वो उनकेही कारण है.

हम सबके म्हणूनच वो एक आदर्श है. हम सबको म्हणूनच उनकाही आदर्श है. समाज के लिये बांधिलकी कोई उनसे ही शिके. उनके अखंड काम करनेका हमे नक्कीच अनुकरण करना चाहिए. तो  ही हम पुढे जा सकेंगे. हमे उनसे म्हणूनच खूप शिकनेकी गरज है. इनके पाय पर पाय रखकेही हम ये कर शकेंगे. याशिवाय उन्होंने विशेषतहा तरूणोंको ऐसा शिक्षण दिया है कि उससे तरूण पीढी का उद्धार होगा. महिला वर्ग करताभी उन्होंने काम किया है. म्हातारे कोतारे लोकोंको पण मदत करनेका उनका स्वभाव है. म्हणूनच वो आबालवृद्धोंमे इतने लोकप्रिय हैं. उनके अनुयायी म्हणूनच प्रचंड संख्यामे इधर जमा हुए हैं .

यादवजी साहेबजी अपना भाषण ठोकेंगे इसकी आप वाट देख रहे हैं इसकी मुझे कल्पना है. यादवजी एक फर्डा वक्ता हैं. उनके भाषणमे विचारोंके मोती टपकते हैं. उनके विचारोंकी गंगा बहती है. हम सबको उस बहती गंगा में हमारा हात धोके लेना है. मेरा ही उदाहरण देता हुं. मैं पूर्वी एक वाया गया लडका था. पण मैंने एक दिवस उनका भाषण सुना. उसके बाद मैं बहुत कुछ शिका. फिर मैं भाषणोंमेंसे ही शिकता गया. आज मैं जो भी कुछ हूं वो उनसे शिककर ही हुआ हूं. उनसे शिकशिककरही मैं इतना मोठा हुआ हूं. उन्होंने तरूणोंको क्या दिया उसका जिवंत उदाहरणही मैं हूं. उनके विचारोंसेही एक वाया गया हुआ लडका इस एरिया का नेता बन शका है.  म्हणून ज्यादा टाईम न लेते हुए मैं मेरे ये चार शब्द संपवता हूं.

रामनरेशजी यादवजी का स्वागत करते समय मेरा हृदय बहुत उचंबळ रहा है. मेरी विनंती है की यादवजी हमारे इस प्यारको ग्रहण करे. हमारे इस युनिट कॉ ओर से उन्हें हार डाला जायेगा और फूल ना फुलाची पाकळी करके नोटोंका हार घाला जाएगा. मेरी यादवजी से यह विनंती है की वे यह स्वीकार करे  और अपने विचारोंसे लुप्त भाषणसे हमे प्रज्वलित करे.

**घास घे रे बाळा**
**(नव्या पिढीच्या मम्मीचा बाळाशी संवाद)**

लूक,लूक,लूक म्हणते ना, अरे तिथे नाही रे हियर, हियर पहा रे, इकडे लूक रे बाबा.

धिस टॉडलर जस्ट डझंट ऐक. लिसन रे बाबा.

ऍंड लूक हियर आणि टेक धिस घास. काय रे असा तू?

सी धिस घास ऑफ चिऊ. स्पॅरोताई स्पॅरोताई दार उघड. सी इकडे आणि तोंड उघड, ओपन रे तोंड लवकर. माऊथ. माऊथ उघड. घे, हा घास क्रोचा. क्रोदादा क्रोदादा कम फास्ट. आणि बाळाच्या हेडवरून उडून जा.

वा ! वा ! बाळाने घेतला फर्स्ट घास, आमचा बाळ फर्स्ट क्लास. आता इट लवकर लवकर. नीट बाईट कर नाहीतर जस्ट गिळशील. इट लवकर लवकर.

शो, शो तुझं माऊथ, तोंड उघड. ओपन, ओपन.

हा घास गेला बाळाच्या पोटात, इनसाईड इकडे.

नाऊ हा घास इज ऑफ चिऊ. चिऊताई चिऊताई कम फास्ट, बाळाचा आमचा ब्रेकफास्ट.

अरे अरे. सी हिअर सी, क्रो हॅज कम. हा बाईट क्रो चा. क्रो भाऊ तू नको खाऊ. हा माझ्या बाळाचा बाईट. तुला नो नो. बाळ लाफिंग हो हो हो होss

लिसन ना बाळ, आता खाऊन झाले की वुई बोथ विल गो इन बाग. आपण दोघे विल प्ले. व्हॉट गेम? ब्याट बॉल? फुटबॉल? मी थ्रो बॉल, यू हिट. किती शहाणा बाळ ऑफ माईन.

घे रे, टेक टेक

नीट चावून खा, डोण्ट गिळ नुस्ता.

आता माझ्या बाळाला श्टोरी सांगते,

एक असते फॉरेस्ट.त्या फॉरेस्टात की नाही एक मोठ्ठा टायगर असतो. मम्मी टायगर आणि तिचा लिटील बाळ टायगर. त्या बाळाचे पोट एकदा दुखायला लागते. तो काय बोलतो, मम्मी मम्मी, पोट दुखते. मग मम्मी काय बोलते माहितीये, अरे तू ती बकरी खाल्लीस ना काल ती चावली नसशील, नुसतीच गिळली तर पोटात बाऊ होतो. म्हणून माझा बाळ नीट बाईट बाईट करून गिळेल.

शाणा किती बाळ.

चला स्पॅरोताई स्पॅरोताई हाट, बाळाचे जेवण फाट. क्रो दादा क्रो दा उडून जा.

चंदामामा, मूनमामा ये ये आता बाळ गाई गाई करत स्लीप करणार,

बाळ आमचा स्वीट बॉय, सॉंग ऐकून झोपी जाय.

**डिग्या ! एक स्वगत !**

डिग्या..

कुठे मेलास रे डिग्या..

लवकर, अरे डोंगराला आग लागली.. पळत ये रे

डिग्या..

तुम्हाला सांगतो, हा डिग्या ना..

डिग्या म्हणजे माझ्या दिमतीचा दिमती ! दिगंबर मधुकर आणि ती म्हणजे तिरपुडे बरं.. तुम्हाला काय वाटलं तिसमारखे की तिरपागडे? नाही, तसे विशेषण म्हणून वापरायला अगदी काय म्हणतात ते apt म्हणजे योग्य, पण याचे नाव आहे तिरपुडे. तिरपागडे नाही.

आता आपल्याकडे ही नावाची सिस्टिम काय आहे पहा ना.. दिगंबराचा डिग्या होतो, तसा बाळकृष्णाचा बाळू, मोरेश्वराचा मोरू होतो. सुलोचनाची सुलू होते नशीब.. लोचनाची लोच्या नाही होत.. एकदा आली होती आमच्याकडॆ पंच्याहत्तरीची बेबी! तोंडाचे बोळके.. बेबीप्रमाणे. एक बरेय, कोणी बोलू शकत नाही तिला एवढी घोडी झालीस.. ही म्हणेल मी बेबीच !

तर मी काय म्हणत होतो.. हां डिग्या.. आहेस का वारलास? मृत्युमुखी की धारातीर्थी? निधन की देहावसान.. की निर्वाण.. स्वर्गवासी की नुसताच सर्वसामान्य इसमासारखा मेलास? खरे सांगू ही वर्गवारी पेपरवाल्यांची. हे लोक ठरवतात.. कोण वारला.. कोणाचे निधन की देवाज्ञा वगैरे वगैरे..

आता हे बोलण्यापुरते हो. डिग्यावाचून या घरात पान नाही हलत. म्हणजे अगदी शब्दश: बरे. आता इथले तीर्थरूप आणि त्यांचे छोटे तीर्थस्वरूप बंधू.. दोघे पानबाज. आता त्यांना पान खिलवणार कोण? डिग्या ! त्यामुळे तो नसला तर पान हलत नाही हो..

( टेलिफोनची रिंग वाजते )

हॅलो, कोण हवंय? आकाश? आकाश कोण? नाही मी आकाश नाहीय हो.. काय..

( फोन बंद होतो, रिंग परत वाजते )

कसे काय? रॉंग नंबर.. कोण? आकाश? नाही हो आकाशकुमार नाही.. पाताळकुमार बोलतोय मी.. रॉंग नंबर हा..

हुश्श..  या फोनाचा काय भरवसा नाही हो.. कुणाचा, कशासाठी, कधी, कसा, का, केव्हा येईल काय सांगता येतं का? आता याला हवाय आकाश.. त्याच्यासाठी आकाशपाताळ एक करतोय.. असेल काही काम पण.. मी पण करतोय तसं आकाशपाताळ एक डिग्यासाठी.. डिग्या कुठेस रे तू?

( रिंग परत वाजते )

यस्स.. बोलतोय. हां.. हो.. हो.. हवीय. तुमच्याच फोनची वाट पाहतोय.. वा.. अगदी वेळेवर.. कालच एक घेतली.. वीस लाखांची. तुम्ही द्या.. पंचवीसएक लाखाची.. जास्त घेतली तर? स्वस्तात द्याल? नाही म्हणजे होलसेल.. अहो असे काय? नेहमीच्या

गि-हाइकाला..

ठेवला वाटतं.. लाईफ इन्शुरन्सवाल्यांचा हो.. मिळाला स्वस्तात तर घेतो म्हणालो तर दिला ठेऊन.. तरी बरे फोन तिनेच केला होता.. जिंदगीके बाद भी म्हणाली.. म्हणजे काही भूतप्रेत?

पण तुम्हाला सांगतो, त्यापेक्षा ना मला त्या जाहिराती आवडतात.. क्या आप समश्याओंसे परेसान हैं? हमारे पास है समाधान.. मस्त! समाधान हॉटेल ! म्हणजे ते नाक्यावरचे हो. उसळ मिसळ पाव नि वडापाव स्पेशल ! समाधान व्हायलाच पाहिजे पहा ! तर त्या जाहिराती.. म्हणजे त्या जाहिरातील्या सारख्या समश्या नाहीत.. पण तसे लिहीतात.. भटको चाहे जिधर काम होगा इधर ! बाबा बंगाली!

खरं सांगतो हया बाबाइतका हेवा मला कोणाचा वाटत नाही. काय करीयर आहे ! वर समाजसेवा.. त्याचे पुण्य वेगळे.. दक्षिणा अलग !

तशी मलाही एकदा दक्षिणा मिळालीय.. वरदक्षिणा ! माझ्या दिसण्यावर नका जाऊ.. पण माझी बायको.. मी आता इथेय.. ती नाही. आता ती इथे असती तर मला इतका वेळ बोलू दिलं असतं का? मी असतो एक श्रोता हो ! तर काल प.पू.जीवनशिक्षणसेवा वाले श्री.श्री. बबनराव घोरपडेबापू बोलले, काही ही व्हा वा होऊ नका.. श्रोते व्हा ! आता मी हिच्यापुढे काय? उरलो ऎकण्यापुरता ! तुम्हाला म्हणून सांगतो हे बापूंजींचं करियर पण बेश्ट! उपदेश.. ज्ञानामृत.. बोधामृत.. डोंगरे बालामृत? नाही पाजामृत.. नाही पाजा अमृत !

( बेल परत वाजते )

हॅलो.. हो मीच.. वा ! छान ! मी आता तुम्हाला फोनच करणार तितक्यात तुमचा फोन आला.. हो मी देईन तुम्हाला.. तुम्ही कशाला तसदी घेताय? मला काल फोन आला.. ते दहा देताहेत.. मी तुम्हाला देतो ना लोन.. नो पेपर वर्क.. नो डॉक्युमेंटस.. अगदी इझी इन्स्टॉलमेंट्स.. परत तुम्ही हप्ता विसरलात ना तर आमचा माणूस येईल.. वसुलीला.. होम सर्विस हो.. परसनल लोन..

अरे.. ठेवला वाटतं हिनी पण.. कायपण बाई तुझं.. नो मॅनर्स, स्वत:च फोन करतात स्वत:च ठेवतात.. बोलूसुद्धा देत नाहीत..

तर माझे काम आहे डिग्याकडे.. दिगंबरा.. दत्ता दिगंबरा याहो.. सावळ्या मला भेट द्या हो..

सावळ्या म्हणालो म्हणून चकू नका बरे.. आपल्या देशावरची माती नी त्यातील माणसं.. काळी.. ते गाणं आहे ना.. ही काळि आई.. तिची काळी मुलं.. तर काळा असूनही दिलवाला.. डिग्या.. येरे बाबा.. थकले रे डोळॆ माझे..

समोर एक मासिक पडलेले.. ते उचलून मोठ्याने वाचतो.. पाहू काय ते.. ऎका..

*काय म्हणतेस?*
*काहीतरी बोलू नकोस.. मी काही बोलत नाही म्हणून*
*नाही तसे थोडीच..*
*माझे डोके फिरवू नकोस*

*कशाला.. ?*

*अगं मला आणखी चिडवू नकोस*

*मी म्हणाले ना नाही.. नाही म्हणजे नाही..*

*मागच्या वेळेची गोष्ट वेगळी होती*

*वेगळीच.. तेव्हा आपण तिकडॆ होतो..*

*इगतपुरीला? नाही.. कल्याण असो तुझे*

*काय कल्याण? नाही कर्जत.. नाही कसारा*

*कसाटा कसला.. तुला खायचं सुचतंय.. तो आईस्क्रीम मधला.. तशी तू ओव्हरवेट नाहीस*

*मी नाही खात. एकदम खतरनाक*

*नाक? सर्दी झालीय? रूमाल घे*

*रूमाल? धमाल आहे नाही?*

*बरं बाई कमाल आहे, धमाल आहे नि रूमाल पण आहे..*

*ओके कल्याण आहे नि इगतपुरी आहे..*

*पुरी? कालच खाल्लीस पाणीपुरी*

*तुला खाण्याशिवाय सुचत नाही काय?*

*सॉरी..*

*सॉरी? नको बाबा.. तुम्ही कशाला.. आम्हीच सॉरी..*

हुश्श.. .किती नाटकी? काय लिहितात? लिहिणारे लिहितात पण वाचणारे? नि छापणारे? काय पण.. नवनाटक असणार.. खरं सांगू मला आवडतं वाचायला.. काय ते सांगू? जाहिराती. जाहिरातीतल्या आयडियांइतक्या अजून कुठे असतात काय? कालच पाहिली जाहिरात.. वाळवंटात हिरवळ फुलवा म्हणे.. कसली जाहिरात माहितीय? केसांच्या तेलाची!

( दरवाजावरची बेल वाजते, चुकून हा फोन उचलतो )

अरेच्चा.. मला भास होतोय काय?

( परत एकदा बेल वाजते )

आता नाही फसणार.. तर सांगत काय होतो.. डिग्या.. कुठे कडमडलाय? इथे त्याच्यावाचून पान हलत नाही.. इतक्या कामाचा डिग्या गेला कुठे?

( बाहेरून आवाज .. बेल वाजते.. डिग्या.. दार उघड.. मेलास की काय की कुठे कडमडलायस? डिग्या.. )

सॉरी हां.. दार उघडायलाच लागेल, तेही मलाच. कारण मीच डिग्या. घरात कोणी नाही.. म्हणून जरा टाइमपास.. नाटकवाल्यांच्या घरात हे अजून एक नाटक.. एकजात सारे नाटकी ! म्हणजे नाटकात काम करणारे हो. भाऊसाहेब, दादासाहेब, ताईसाहेब, झालेच तर सतीशभैया, तुम्हाला सांगतो, कुठे बोलू नका, सतीशची लाईन आहे ना गौरी ती पण नाटकातली. सगळ्यांचे ऐकून माझेपण सगळे हे बोलणे पाठ झालंय. माझं पाठांतर उत्तमच नाही का? काय म्हणतात भाऊसाहेब.. चोख अगदी.

( बाहेरून परत आवाज.. डिग्या.. उघड दार.. वारलास की धारातीर्थी पडलास.. ?)

आलो आलो.. जातो हो.. जायलाच पाहिजे.. बाय !

**ऑफ द रेकॉर्ड !**

**या सत्तेत जीव रमत नाही !**

( काही निवडक पत्रकारांशी मनमोकळा संवाद )

कुणाला काहीही वाटो पण या सत्तेत जीव रमत नाही आमचा हो.

म्हणजे होते काय ना ही गाडी.. तो बंगला.. आमची ती प्रतिष्ठा, निष्ठावान कार्यकर्ते.. सारे काही आहे. लाल दिव्यांची गाडी, सलाम ठोकणारे पोलिस नि कर्मचारी.. सारे हाताशी आहे.. दैवगती किती अनाकलनीय असते नाही? काही वर्षांपूर्वी एक कुठल्या गुन्ह्यात.. गुन्हा म्हणजे विशेष नाही, कुठलातरी खुनाचा मामला.. त्यात अटक करायला आलेल्या पोलिस ऑफिसरचाच आज मी सलाम घेतोय.. खरे सांगतोय.. मनापासून.. या सत्तेने मला खूप काही दिले.. मानमरातब, प्रतिष्ठा.. चरचौघात कबूल नाही करत.. पण ऑफ द रेकॉर्ड.. पैसा ही..

तसे पण माणसाला काय लागते हो? एखाद दुसरी गाडी, जाऊ तिथे रहायला बंगला, नोकरचाकर, हुकूम झेलणारा सेवकवर्ग नि बरावाईट का असेना पण नावाचा दबदबा नि वचक. याहून काय लागते माणसास? त्यामुळे साध्या राहणीचा माझा बाणा.. साधेपणा जपणे ही गोष्ट मी शिकलो ती थेट पूज्य बापूजींकडून म्हणजे गांधीजींकडून. त्यांचा कार्यकाल संपून वर्षे लोटली तेव्हा त्यात कालानुरूप बदल मी केला इतकेच. थोडक्यात माझ्यासरख्या साध्या नि कमीतकमी गरजा असणा-याला ही सत्ता गुदमरवून टाकते हो.

आता ऑफ द रेकॉर्ड सांगायचे ना तर काय आहे, ही खुर्ची.. सगळे म्हणतात या खुर्चीसाठी सगळे राजकारण सुरू आहे. खुर्चीचा मोह खूप वाईट.. तो सोडता सोडवत नाही.. वगैरे वगैरे.. बोलणारे कोण? जे आयुष्यात कधी या खुर्चीवर नाही बसले नि बसायची शक्यताही नाही ते बोरूबहाद्दर मोरू पत्रकार. अर्थात त्यात ही सगळे तसे नाहीत. अजूनही खाल्ल्या मिठाला जागणारे तुमच्यासारखे प्रामाणिक पत्रकार आहेत, नाहीत असे नाही, पण काही काही आहेत ना मीठसुद्धा न खाणारे.. ते कसले.. .टीका करण्यासाठी जन्म आपुला समजणारे. ते बोलतात

काहीबाही.. आता त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देऊन का आम्ही खुर्ची सोडू? सत्तेत मन रमत नसले तरीही. लोकसेवेचा हा वसा असे उतून नि मातून टाकून देणे नाही आमच्या स्वभावात.

तुम्हाला म्हणून सांगतो.. हे पत्रकार वगैरे असतात ना ते सगळ्या समाजाच्या समस्यांच्या मुळाशी असतात. दूर कुठे खुट्ट झाले.. द्या बातमी. अरे आमचा मतदारसंघ कुठल्या कोप-यात.. त्यात मोजून लोक किती? काही लाखभर. होऊन होऊन काय होणार आहे? पण नाही.. झाली थोडी पैशाची गडबड.. अफरातफर नाही.. गडबडच.. काही लाख ही काय अफरातफरीची रक्कम आहे.. आमची काही इज्जत आहे की नाही.. तर झाली गडबड.. देऊन टाका बातमी.. तर मुंबई काय.. पुणे काय.. नागपूर काय.. सामान्य माणसाला काय झळ पोहोचणार आहे? छापा बातम्या नि टाका त्या भाबड्या जनतेस संभ्रमात. अरे कुठे फेडाल ही पापे? आणि इतके पैसाकेंद्रित कसे तुम्ही बोरूबहाद्दर? सगळीकडे तुम्हाला पैसाच दिसतो? अरे या सत्तेत मन रमत नाही याला कारण हेच.. तुम्ही.. काही करू पाहतो.. लागले हात धुवून मागे..

चुकून त्या दिवशी कोणा माणसावर.. म्हणजे तो हवालदार होता.. वाहतूक खात्यातला.. ते महत्त्वाचे नाही.. आम्ही म्हणतो, सर्वप्रथम तो एक माणूसच.. त्याने शिट्टी फुंकून रस्त्यात गाडी अडवली.. भडकले आमचे माथे,,दिले दोन ठोसे.. आता यात आमचे काय चुकले? चांगला पन्नाशीतला पोलिस.. जनसेवक.. शिट्ट्या फुंकतोय म्हणजे काय? भारतीय संस्कृती नावाची काही चीज आहे की नाही? त्यात हे शिट्ट्या फुंकणे कुठे बसते? पण त्या बोरू मोरूंनी त्याची बनवली बातमी.. चारदोन ठोसे ते काय.. त्याची एवढी मोठी घटना घडवावी या पत्रकारांनी? जसा काही आम्ही जीवच घेतल्या.. साधा रस्त्यावरचा माणूस बरा.. मनात येईल त्याला मारू शकतो.. त्याची नाही येत कधी बातमी. होतात एवढ्या मारामा-या.. वाचलेय कधी त्याच्याबद्दल? पण आमच्या नशिबी नाही ते सुख.. मग सांगा कसे रमेल या खुर्चीत मन?

आता काही दिवसांपूर्वीची बाब.. शहीद जवानाच्या घरी भेट.. त्यासाठी झाला मोठा इंतजाम. त्यात एवढे काय मोठेसे? बातमी काय? तर शहीद सैनिकाघरी भेटीसाठी त्याच्या घरी आम्ही तात्पुरते सोफा नि पंखे नि एसी घेऊन गेलो.. नि आम्ही निघताच ते काढून घेतले गेले. ही काय बातमी आहे? हे सारे काय आम्ही स्वत:साठी नेलेले? आम्ही टीव्हीत दिसू.. आमच्या मागे सैनिकाचे दारिद्र्य दिसलेले चालले असते तुम्हाला? आणि सरकारी माल तिथेच सोडून त्याचा अपव्यय करण्याची हिंमत नाही आमच्यात.. पण यांनी काय लिहावे? की आम्ही तात्पुरते सारे सामान नेले.. अहो आम्ही गेलो की सगळी चॅनेले येतात.. दिसली असती जगभरात त्या सैनिकाची गरिबी.. रंग उडालेल्या भिंतींचे पोपडे नि ओबडधोबड जमीन.. पायतुटक्या खुर्च्या नि डुगूडुगू हलणारे टेबल.. काय राहिली असती आमच्या शूर नि लढाऊ जान देणा-या सैनिकाची शान? पण त्याचे यांना काही भान? म्हणून तर या सत्तेत नाही रमत हो जीव..

ऑफ द रेकॉर्ड सांगतो तुम्हाला.. आता या ऑफ द रेकॉर्डचाही आलाय कंटाळा.. साधा आम आदमी.. उठतो नि कुठेही काहीही बोलतो. कुणी येते त्याच्या मागोमाग.. बोंडूक घेऊन माईकचे? आम्ही नुसती एक शिबी उच्चारायची चोरी.. की छापतात पेपरात लगेच.. बेताल बडबड म्हणे.. कसा लागेल या सत्तेत जीव? मनमोकळेपणा नाही.. हवे ते खाणे नाही.. पिणे नाही.. सामान्य माणसाला हक्क किती तेवढेही आम्हाला नाहीत.. जरा काही खुट्ट झाले की आहेच ना मग.. हेडलाईन दुस-या दिवशी. का आम्ही भोगतोय हे सारे? या सत्तेमुळे.. नकोच ते.. नाही जीव रमत हो या सत्तेत आता..

आता हे सारे ऑफ द रेकॉर्ड हां.. नाहीतर छापाल उद्या पहिल्या पानावर.. बसलेत आमचे पक्षांतर्गत विरोधक टपून.. काढली खालून खुर्ची तर? म्हणून हे ऑफ द रेकॉर्ड.. म्हणजे अशी रेकॉर्ड लावतो आम्ही मधून मधून.. ते ही ऑफ द रेकॉर्ड ! पण नुसते शब्द नका पाहू.. त्या मागची भावना पहा.. मग पटेल आम्ही म्हणतो का ते.. नाही हो या सत्तेत रमत नाही जीव.. .

**पुराव्याचे शासन !**

बाळांनो.. उठा..
कामाला लागा..
पुरावे तयार करा !
इति : अस्मादिक !
***

बाळांनो..

शासन म्हटले की प्रशासन, सुशासन, कुशासन, दु:शासन वगैरे प्रकार आलेच. थेट महाभारतकालीन संदर्भ आहेत याला. नाहीतर दु:शासन कुठून आला असता? अर्थात ऐतिहासिक व्यक्ती आमच्या आदर्श राहिल्या आहेत सदैव, त्यात कोणी दु:शासनाला आदर्श मानले तर ती चूक कशी मानता येईल? म्हणजे दु:शासन ह्या सर्वनामाला शासन विशेषण म्हणून वापरू लागले असेल तर त्याला ऑब्जेक्शन मिलॉर्ड म्हणणारे आपण कोण लागून गेलो गेलोय काळाकोट वाले लायर.. सॉरी लॉयर? म्हणजे वकील!

आता वकील म्हटले की पुरावे आले. साक्ष आली. अजून काय काय आले. येऊ देत त्यांना. पण ते शासन पुराव्यानेच चालते हे खरे. कोणत्याही वकीलाप्रमाणे मी ह्याला पुरावा देऊ शकतो.

म्हणजे पहा. सोदाहरण सांगतो.. सोडा हरण नाही. सोदा.. .सोदाहरण सांगतो.. .नाही येथे हरणाचा काही संबंध नाही. व्याकरणात कच्चे तुम्ही. स अधिक उदाहरण= सोदाहरण, लक्षात ठेवा, नाहीतर जाल हरण सोडायला जंगलात..

तर पुरावा.. .

आता आपण एक मोठे शहर घेऊया.. मुंबईच घेऊन टाकू. त्यात एक मोठे रेल्वे स्टेशन.. कुर्ला घेऊ उदाहरणार्थ. इथे पण हरण नाही बरे बाळांनो.. उदाहरण म्हणजे साध्या भाषेत example. तर कुर्ला स्टेशन.. तिथे सात आठ आहेत

फलाटदादा.. म्हणजे प्लॅटफॉर्म्स. इकडून तिकडे जायचे तर गतिमान शासन गतिमान गाड्या धाववते. त्यामुळे रूळ ओलांडणे कायद्यावे गुन्हाच नसून तो दंडनीय सामाजिक अपराध ! ( रेल्वेत भाषाविभाग पण असणार बहुधा बाळांनो. तर तिथे पर्मनंट नोकरीसाठी बीए विथ मराठी करा हां.. तेवढेच my सॉरी.. मायमराठीस प्रोत्साहन.. .तर रेल्वे प्रशासनात व्याकरण विभागही असेल का? असणार. खास शासकीय मराठीसाठी शासकीय बाबू असणार तिथे. त्या बाबूंच्या भाषेचे एक उदा.. .हरण पहा, स्टेशनवर उद्घोषणा होते : प्लॅटफॉर्म संख्या एक वरील गाडी बोरिवलॊ जाईल! आता हा प्रगतिपथावरील गतिमान शासनाने पुरवलेला रेडिमेड प्रश्न.. वाक्य शुद्ध करून लिहा! इयत्ता तिसरीसाठी. कित्ती शिक्षकांची काळजी आमच्या शासनाला बाळांनो ! )

तर.. कुर्ला.. कुर्ल्याकडे वळूयात. कुर्ल्याला एक प्लॅटफॉर्मसे दुसरे प्लॅटफॉर्म जाने के लिए कृपया पुल का इस्तेमाल कीजिए.. ऐकून कुणी चढायला गेला त्या रेल्वेपुलावर.. तर रूळांप्रमाणे या सदैव गर्दीने तुडुंब भरलेल्या पुलावर ही जान माल का नुकसान हो सकता है ! पण हे शासनदरबारी अमान्य.पुलावर चेंगराचेंगरी.. .stampede at Kurla railway bridge.. पुल पार करते चार घायल.. अशा हेडलाइन्स अजून पेपरात नाही आल्यात. असे असताना बिना पुरावा शासन काय करू शकते? अजून कोणी मेले नसेल म्हणजे चेंगराचेंगरीच एवढी नसणार, असेल तर पुरेशी नसेल की कोणी त्यात मरू शकेल असा युक्तिवाद शासनाच्या वकीलांनी केला तर त्याचे काय चुकले त्यात? कानून पुरावा मांगता है. और हमारा शासन पुरावेसे.. कायदेसे चलता है.

तसे आम्ही लोकशाहीवादी.म्हणजे लोकांना काही हवे हे माहिती झाल्यावाचून आम्ही कधी पुरवीत नाही काही गोष्टी ! साधे हरण.. .उदाहरण घ्या. कुठल्यातरी हॉस्पिटलात कुठल्यातरी रूग्णाच्या धडधाकट नातेवाईकांनी केली

डॉक्टरला मारहाण.. .हॉस्पिटलची तोडफोड. आता तुम्हाला वाटेल की शासन स्वत: म्हणेल, नागरिकहो,, घाबरू नका.. आम्ही अतिरिक्त सुरक्षा पुरवित आहोत. डॉक्टरांनो तुम्ही आपले कर्तव्य बजावा.. आम्ही तुमच्या सुरक्षेसाठी कटिबद्ध आहोत. रुग्णालयात तोडफोड होऊ न  देणे हे आमचे कर्तव्य..  असे काही शासनाने म्हटले तर ती कर्तव्यच्युती होईल की नाही शासनाची? कारण लोकांना काय वाटते याची दखल त्यात नाही. किंबहुना सामान्य जनतेस तोडफोड करून आपल्या भावनांचा निचरा होऊ देणे शासनास महत्त्वाचे वाटत असेल तर शासनास दोष का द्यायचा? डॉक्टरला सुरक्षा महत्वाची वाटते याला काय पुरावा? त्यामुळे पुरावा म्हणून त्यांनी संपावर जाणे शासनास जरूरी वाटत असेल तर ती शासनाची चूक कशी मानता येईल. तेच उदाहरण रिक्शा किंवा टॅक्सीच्या संपाचे. त्यांना कालबद्ध भाडेवाढ हवी की नको हे ते संपावर गेल्याशिवाय शासनास कसे कळणार? केला ना त्यांनी संप? मग हरकत नाही. आता पुराव्याचे शासन हलवेल हात नि पाय.. तोपर्यंत रूग्णांचे प्रचंड हाल.. किंवा जनतेच्या हालास नाही पारावार.असले मथळे पेपरात आले की शासनास पुरावा मिळतो, जनतेस काय हवे त्याचा शासनास त्यानंतरच पुरावा मिळतो. म्हणजे जनक्षोभ झाला.. .लोकभावना भडकल्या.. आता घ्या हवी ती ऍक्शन.. गतिमान.. प्रगतिपर.. पुढे टाका ते पाऊल.. दु:शासना.. ऐकतोस ना रे?

बाळांनो.. असे गोंधळून जाऊ नका..
तुम्हाला शासकीय मराठीत याहून गुंतागुंतीची मराठी ऐकायचीय..
तेव्हा जरा नीट समजून घ्या..
पुरावे गोळा करा..
शासन तुमचेच आहे !

**कल्याणकारी !**

‘पश्ट‘ता हा आमचा एक स्वभावाचा विशेष आहे. त्यामुळे जे काही असेल ते एकदम पश्ट ! तर आमचे एक असेच पश्ट मत आहे.. बाकी काही असो पण राज्य कसे कल्याणकारीच हवे. सर्वांना सामावत घेऊन जाणारी एखादी नदी असते.. मग ती वाटेत छोटी झाडे येतात की कचरा येतो हे काही बघत नाही, सर्वांना घेऊन ती वाहाते. तसे राज्य हवे. प्रतिष्टितांपासून कचराही सामावून घेणारे. फक्त त्या कच-यास तो कचरा आहे हे सांगावयास न कचरणारे.. ते जाणवून देणारे ते आमचे राज्य.. एवढाच काय तो सर्वसमावेशक नदी आणि आमच्यात मामुली फरक. तेही त्यांनी उत्थानास तयार व्हावे म्हणून. पश्टच सांगतो.. शेवटी त्यातच त्यांचे कल्याण. तर अशा कल्याणकारी राज्यात पददलित.. हीन अतिपतित आणि अल्पसंख्यांक यांना त्यांची ओळख न मिटवता आपल्यात सामावत पुढे जाणारे राज्य..

आता तीच गोष्ट काही वाट चुकलेल्यांची. माणूस गुन्हेगार का बनतो? जन्मत:च कोणी गुन्हेगार नसतो. परिस्थिती त्यास तसे बनण्यास भाग पाडते. अशा उदात्त क्षमाशील भावनेने चालाणारे हे कल्याणकारी राज्य. मग त्यात उच्च-नीच भेद मावळतात. कारण झोपडीतून येवो की महालातून.. सबका मालिक एक असावा तसे.. सगळयांना मत.. एकच !

थोडक्यात काय.. कल्याण.. सर्वांचे. एकच ध्यास.. एकच विश्वास.. कल्याण.. कल्याण.. कल्याण.. सर्वांचे कल्याण. मग त्यात हा आला.. तो आला.. नि आम्ही स्वत:देखील आलोच. कल्याण सर्वांचेच पण त्यात गुणात्मक नि अंकगुणात्मक फरक. तळे राखी तो पाणी चाखी अशा उदात्त विचारसरणीवर पाणी फिरू नये म्हणून तळमळ फक्त. कल्याण करायचे हे काही सोपे काम आहे का? मेहनत किती. उन्हातान्हातून आपल्या गरम तापणा-या एसी गाडीतून फिरणे आले. ज्याला पाठीमागे शिव्या घालाव्यात अशा लायकीच्या माणसांशी जुळवून घेणे आले. मग किती नि कसे कल्याण केले याचा तपशील आला.. सामान्यातिसामान्यास साध्या भाषेत त्याचे कल्याण झालेय हे समजावण्यास जाहिराती आल्या.. याला म्हणतात खरी पारदर्शिता.. transparency. पैशांचे मोल ते काय? आपली कामे झालीत हे

त्या जनताजनार्दनास कळावयास हवे.. भले त्याच्याच पैशातून का होईना. मग पंचवार्षिक उत्सव येतो.. त्यात जीवतोड मिरवणे आले. मनावर दगड ठेवून कठोरपणे लिहिलेले जाहीरनामे आले. जे पूर्ण करणे शक्य नाही ते लिहून अशक्य कोटीतल्या गोष्टी शक्य आहेत असे वाटवून देणे.. मायबाप जनतेचे दोन क्षण आनंदात जावेत याची तजवीज करणे.. ते आले. हा विश्वास.. हा आशावाद.. सकारात्मक विचार करण्याची आदर्श सवय यांचा वस्तुपाठ घालून देणे आले. त्यांच्या कल्याणाची आस.. त्याची धग त्यांना जाणवून देणे आले. जगाच्या कल्याणा आमुच्या विभूती असा दुर्दम्य आशावाद स्वत:तच नसेल तर तो दुस-यास काय पटवणार? त्यामुळे ते ही आले. कोणी निंदा कोणी वंदा,,अशी स्थितप्रज्ञता आली..

आता याबदल्यात आम्ही बिचा-यांनी केल्या काही अपेक्षा तर काय चुकले? एका हातानी दिल्यावर दुस-यानी घेणे ही दुनियेची सर्वमान्य रीत आहे. दिनरात घाम गाळून राज्यरोहण झाले.. आता काही न काही आम्ही करणार.. चांगले.. वाईट.. चूक.. बरोबर.. पण तुम्ही वाईटास वाईट नि चुकीस चूक म्हणू नका एवढी मामुली अपेक्षा आम्ही नाही करू शकत?

लोकांना पैशाचे कौतुक नि मोल फार.. तुकोबांनी मातीमोल समजून धन परत पाठवले. तुकोबारायांना मोह नाही सुटला हेच खरे. नाहीतर सोने नि माती एकच असताना त्यांनी सोने-नाणे परत पाठवण्याची चूक न करून चालले नसते का? वर परत लक्ष्मीदेवीचा उपमर्द? आम्ही या सर्वांपलिकडे. आम्हाला हे सोने.. ती माती असा भेदभाव करण्याची मति नाही.. आम्हाला मोह कशाचाच नाही. तेव्हा जे मिळेल ते आम्ही ठेऊन घेऊ.. भले ते सोने ही का असेना.. की जमीन.. मातीलाही नाही म्हणण्याचे पातक आम्ही नाही करत. मग यात कुणी भ्रष्टाचार असे ओरडावे.. मोहमाया सोडा अशी याच भूमीतल्या संतांची शिकवण असताना? तेव्हा या मामुली पैशांच्या व्यवहाराकडे काक दृष्टीने पाहू नका अशी मामुली अपेक्षा आम्ही केली तर काय चुकले आमचे?

आमची अपेक्षा एकच.. आमची मेहनत पहा.. जाहिराती पहा.. डोळे दिपवून घ्या.. उगाच काय टीका बिका.. कुजकटपणा त्यागा हे याच भूमीतील संतांनी सांगितले ना? नसेल सांगितले तर तसे सांगणारे सरकारी संत आम्ही बनवून घेऊ शकतो.. पण तो दळभद्रीपणा.. टीका-बिका सोडा.

आणि काय करा म्हणता? आम्हाला तुम्ही एत्तदेशीय आहेत का याचाच संशय येतो. अरे काय करा काय? आपल्या संस्कृतीत काय करतात.. देवाची? नाही ना माहिती? वाटलेच.. तुम्ही तसलेच.. मागासवर्गीय.. सॉरी.. आम्हाला तसे बोलायचे नव्हते.. मागासवर्गीय वगैरे.. उद्या पेपरात आले छापून तर.. आमच्या बोलण्याचा विपर्यास केला असे म्हणू आम्ही.. तर अहो देवाची करतात ती, आरती.. राजा हाच देव.. लोकशाहीत कुठला आला राजा? यांना सामान्यज्ञान शिकवा रे.. तर करा काय? आरती..

अरे दिवसरात्र एक करून तख्तनशीन झालेल्याने एवढ्या मामुली अपेक्षाही ठेऊ नयेत की काय?

शेवटी जगाच्या कल्याणा आमच्या विभूती.. कल्याण.. एकच ध्यास.. एकच श्वास.. कल्याण.. कल्याण.. कल्याणकारी राज्य आमुचे.. ही तो श्रींची इच्छा..

कल्याण असो.. तुमचे.. तुम्हाला कल्याणकारी आमचे राज्य.. दिसत नसेल तर !

**अखिल भारतीय विश्व गौ संमेलन**
**कपिलागाईचे अध्यक्षीय भाषण : एक संवाद**

Guys ,

आज आपण इथे का भेटतो आहोत याची तुम्हाला कल्पना असेलच.

फार वर्षांपूर्वी एक गाय नि तिचे वासरू.. गाय वासरू नका विसरू.. म्हणून प्रसिद्ध होती. पुढे त्या गायीला सर्वांनी हात दिला नि त्या गायवासरू नका विसरू ला सगळे विसरले. आज इतक्या वर्षांत सगळया देशाच्या केंद्रस्थानी आपण आलो आहोत याचा आनंद आणि अभिमान आपल्यापैकी प्रत्येकीस वाटावयास हवा.

पण तो अभिमान नुसताच पोकळ राहू नये. म्हणजे काय की आपण इतर सामान्य देशवासियांकडून प्रेरणा घेऊन आपल्याही काही मागण्या पुढे मांडायला म्हणजे हंबरायला पाहिजेत. अर्थात त्या सामान्य माणसाहूनही चांगले दिवस guys आपल्याला देसत आहेत आणि दिसणार आहेत यासाठी आपल्याच पोटातील तेहेतीस कोटी देवांचे आपण ऋणी राहावयास हवे. आपण एवढ्या ग्रेट आहोत याची शंका माझ्या मनात खूप पूर्वीपासूनच होती, पण guys, आता मला खात्री पटलीय आपल्या महानपणाची. एक कल्पतरू.. म्हणजे नारळाचे झाड आणि आपण कामधेनू.. सर्व इच्छापूर्ती करणा-या. ह्या आपल्या समकालीन मानवी संस्कृतीत आपले महत्त्व अनन्यसाधारण आहे.

आपली शिंगे, आपले खूर, वशिंडे नि आपला ह्म्म आवाज आणि उदरस्थ तेहेतीस कोटी देवांची वस्ती हे आपले, मानवी भाषेत सांगायचे तर USP आहेत. सध्या आपल्याला चांगले दिवस आले आहेत. त्यांस देशवासीय अच्छे दिन म्हणणात म्हणे. आपल्या एकएक जीवास तिथे मनुष्याहूनही जास्त किंमत आहे. अर्थात ती तशीच आहे असे मात्र वाटून घेऊ नका. तेथील सामाजिक उतरंडीत कोण कुठे आहे यावर तेथील माणसाची किंमत ठरते. तो जर विशिष्ट मर्यादेपलिकडील असेल, जातीपाती वा धर्माने, तर मात्र आपण त्यांच्याहून श्रेष्ठ ठरतो. मग आपल्या शिंगानाही कोणी धक्का लावला.. किंबहुना तसा संशयही कोणास आला तर guys, तेथील आपले रक्षक त्या राक्षसरूपी नराचा नायनाट करण्यास मागेपुढे पाहात

नाहीत. यात ते अतुलनीय शौर्य, धर्मरक्षण, कायद्याच्या चौकटीबाहेर जाण्याची हिंमत.. यास कोणी कायदा हाती घेणे का म्हणेनात तेथील काही छद्म बुद्धीजीवी.. .यांचा एक आदर्श घालून देत आहेत. याबद्दल आपल्या सर्वांना त्या आपल्या पोटातील तेहेतीस कोटी देवांहूनही अधिक ऋणी राहावयास हवे.

तर एवढ्या प्रस्तावनेनंतर आपण आपल्या मागण्या पुढे रेटणे गरजेचे आहे. आज कधी नव्हे ते सरकार आपल्यासाठी आहे, आपल्याला मान आहे, इज्जत आहे, आपले गोठे थोडेफार तुटकेफुटके असतीलही पण आपली आयुर्मयादा उंचावण्यास या मानवजातीने जातीने प्रयत्न चालवले आहेत.

अशातच आपण आपल्या तीन प्रमुख मागण्या हंबरावयास हव्यात.

सर्व प्रथम भाषासुधार. भाषा हा संवाद आणि संबंधाचा आत्मा आहे. तेव्हा मानवी भाषेत सुधार ही आपली मागणी आहे. कोणास गरीब गाय म्हणून हिणवणे खूप झाले आता. ही उपमा मागे घेण्याचे दिवस आले. इतरही काही आहेत.. शिंगे मोडून वासरात शिरणे, वासरात लंगडी गाय शहाणी वगैरे. आपण गायी कधी चकण्यांत चष्मेवाला शहाणा.. किंवा गोगलमाणूस..  पोटात काणुस.. असले काही हंबरतो का आपल्या गौभाषेत? उलटपक्षी आपण त्यांस दूधच देत आल्या आहोत. कोणी भाकडगाय शब्द वापरत असेल तर आपण बिनकामाच्या माणसास भाकडमाणूस म्हणून हिणवतो का? तेव्हा guys, मराठी भाषा समिती याउपरही हे असले वाक्प्रचार मागे घेत नसेल आपण त्यांच्यावर शिंगे रोखून मोर्चा काढला पाहिजे. आपल्यावर हल्ला करण्याच्या नुसत्या संशयावरूनही निहत्यारींवर चालून जाणा-या हत्यारी अशा आपल्या रक्षकांच्या एक दशांशही धैर्य आपण अंगी बाळगू शकलो तर आजचे आपले संमेलन सार्थकी लागले असे म्हणता येईल.

आता चारा.. माणसाच्या जेवणाच्या प्रमाणीकरणासाठी तिथे FDA नावाची संस्था असल्याचे आमच्या कानी आणि ध्यानी आले आहे. आपला चारा.. त्यात फायबर किती..  प्रथिने किती.. वगैरे छापून येत नाही. किंबहुना आपल्याला ब्रॅंडेड चाराच मिळावा ही मागणी आपण एक खुराने केली पाहिजे. रस्तोरस्ती आपण खातो त्या प्लास्टिकच्या संगीबेरंगी चवहीन पिशव्या, यासारखे नित्कृष्ट खाद्य मानवाने बंद करून अधिक चवदार प्लास्टिक बनवले पाहिजे. या

प्लास्टिकवरील पोषकद्रव्ये किती यांची नोंद हवी म्हणजे आमच्या guys ना informed choice राहिल. आपल्या हितासाठी झटणारे आपले रक्षक आपली ही मामुली मागणी नक्कीच नाकारणार नाहीत.

आपली अजून एक मागणी आहे ती चरण रक्षक.. किंवा खूर रक्षकांची. काटाकुट्यांतून चालताना पायत रूतणारे काटे या मानवजातीस दिसत नाहीत असे थोडीच आहे? पण त्याने डोळयावर कातडे.. भले ते कातडे आता आपले नसो.. ओढायचे ठरवले तरी आपण किमान चरणरक्षक पादत्राणांची अपेक्षा करू नये?

सध्या ह्या आपल्या प्रमुख व तातडीच्या मागण्या आहेत. हा मानव तापल्या तव्यावर पोळी भाजून घेतो.. ते न जमल्यास तेढी उंगलीसे घी निकलता है म्हणून उंगली तेढी करतो. तेव्हा आपणही हया गोमय.. म्हणजे शेण नव्हे.. वातावरणात आपल्या मागण्या आपल्या वशिण्डी पाडून घ्यावयास हव्यात.. .न पेक्षा..

Guys, हा ‘न पेक्षा’ मी तुम्हाला सांगणार नाही.. किंबहुना हा नपेक्षा शब्दच मानवाच्या शब्दकोशातून घेतलाय.. तुम्हाला ऐकवायला. तेव्हा ही धमकीची भाषा आपल्यासारख्या गायींस.. गरीब गायीस नाही.. पण सत्शील, सुशील वगैरे गायींस.. शोभणार नाही. आज तेहेतीस कोटी देवांस आपण आपले उदर राहावयास दिले आहे. त्यांचा मान राखून, आपण गायी कितीही मोठ्या झालो तरी या प्रवृत्ती आपल्यात न येवोत ही माझी त्या उदरस्थ देवांस प्रार्थना.

Guys, सामर्थ्य आहे चळवळीचे.. सामर्थ्य आहे एकजुटीचे.. तेव्हा समस्त भारतवर्षातील गायींनो.. एक व्हा.. गौ एकतेचा.. विजय असो.. गौ एकता.. झिंदाबाद.. Guys.. एक खुराने.. एक वशिण्डाने.. एक शेपटीने नी दो शिंगाने.. .विजय आपलाच आहे!!

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

“Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow.”

– Oliver Wendell Holmes

www. esahity. com वरून डाऊनलोड करा .

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा .

हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे 7710980841किंवा नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा .

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहेते .download करा .

हे सर्व मोफ़त आहे.